विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१५ |
| वर्ष | : | पन्नासावे |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१५**

**गणपत्रिका क्रमांक : १८५**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : पन्नासावे, अंक : तिसरा भाद्रपद/अश्विन शके १९३७, ऑक्टोबर २०१५

## *संपादकीय*

## उत्सवांची अरेरावी

'सण', उत्सव, खेळ हे जगातील सगळ्या समाज गटांचे अविभाज्य अंग आहेत. समाज जसा विकसित होत जातो, तसा विरंगुळा आणि करमणुकी पलीकडे कला, तत्वज्ञान, अध्यात्म यांचे पदरही त्यामध्ये समाविष्ट होतात. कालांतराने त्याला एका परंपरेचे स्वरुप येते. या सगळ्या सांस्कृतिक छटा, शेवटी व्यक्तीला किंवा समाजाला आनंद तर देत असतातच, पण त्यातून समाजाचे एक प्रबोधनही होत असते. यांची सुरुवात ही जशी एखाद्या महत्वाच्या घटनेमध्ये असते, तसेच निसर्गामध्ये होणाऱ्या बदलांची नोंद घेणारीही ती असते. रक्षा बंधन किंवा भाऊबीज जशी नाती दृढ करतात तसेच नारळीपौर्णिमा, बैलपोळा यांचे प्रयोजन वेगळ्या सामाजिक घटनेमध्ये असते. हे सगळेच सण आणि उत्सव लेखक, कवी ,आणि कलाकारांच्या सृजनशक्तीचे स्त्रोत असतात. बदलत्या काळाप्रमाणे यांच्यामध्येही लवचिकता आणि बदल हे अपेक्षित असतात.

जनू ते सप्टेंबर महिन्यापर्यंत पंढरपूरची वारी, दहीहंडी, गणेशोत्सव, यावर्षी नाशिकचा कुंभमेळा हे महाराष्ट्राच्या संस्कृतीतील अत्यंत महत्वाचे उत्सव साजरे झाले. यांचे आजचे स्वरुप मात्र वर सांगितलेल्या प्रयोजनापासून मैलोगणती दूर गेलेले दिसते. या सणांच्या साजरी करणामध्ये आलेल्या विकृतीचा शोध घेणे आवश्यकच नाही तर अपरिहार्य आहे.

१७ व्या शतकामध्ये महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी, तुकाराम आणि रामदासस्वामीं सारखे महान संत होऊन गेले. शिवाजी महाराजांना जुल्मी यवंनी शक्तींपासून समाजाची सुटका करुन, हिंदवी स्वराज्य आणि 'सुराज्य' स्थापन करायचे होते. तर याच समाजामध्ये आलेली मरगळ आणि कालबाह्य रुढीं पासून त्यांना मुक्त

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | 10884930955 | SBIN 0009056 |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | 009110100016689 | TJSB 0000009 |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | 002115000024520 | TBSB 0000002 |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे४००६०१. दूक्र : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश, न्याय व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| श्रीशैले मल्लिकार्जुनम्। | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ४- युगपुरुष | ७ |
| वामनाची गोष्ट | १० |
| ''अर्धनारीनटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरूपवर्णन'' | १६ |
| राम: अस्माकं मन: पातुं ॥ | १८ |
| भातखंडे सर - एक ज्ञानरत योगी | २३ |
| बुद्धिवाद आणि बुद्धियोग | २६ |
| प्रमाण | २७ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि रु. ५
३) हरितालिका पूजा विधि रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) रु. १०
६) तुलसी विवाहविधि रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५
(या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी रु. ४०
१३) गंगालहरी रु. २५
१४) गणपत्यथर्व शीर्षातील व्याकरण रु. ३०
१५) सांख्यदर्शन रु. ५०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः रु. १५
(हस्तलिखीत)

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

श्रीमती शौचे सुनंदा प्रमोद, ठाणे

श्री. साखरे शेखर सुदर्शन, पुणे

**देणगी जुलै ते सप्टेंबर २०१५**

श्री. पेडणेकर विजय सखाराम, मुंबई - रु. १,१११/-

श्री. कमलाकर अनंत महादळकर, कळवा, ठाणे - रु. ५००/-

**- संपादक**

लेख २४ वा

**अनिच्छयापि संस्पृष्टो दहत्येव पावकः।।**[३१८]

विस्तवाला चुकून स्पर्श झाला तरी तो चटका दिल्याशिवाय राहत नाही. (कारण तो त्याचा स्वभावगुण आहे.)

सुभाषिताची पहिली ओळः-

**हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृतः।**

परमेश्वराचा देखील असाच स्वभावगुण आहे की एखाद्या दुष्टाने जरी त्याचे स्मरण केले तरी तो त्याची पापे नष्ट केल्याखेरीज राहत नाही.

**अनर्घ्यमपि माणिक्यं हेमाश्रयमपेक्षते।।**[३१९]

मौल्यवान रत्न असले तरी त्याला सोन्याचा कोंदणाची गरज लागतेच.

सुभाषिताची पहिली ओळ :-

**गुणैः सर्वज्ञतुल्योऽपि सीदत्ये को निराश्रयः।**

मनुष्याच्या अंगी कितीही गुण असले तरी त्याला आश्रय नसेल तर एकट्याला शिखर गाठणे कठीण जाते.

**आवृणुध्वमतो दोषान् विवृणध्वं गुणान् बुधाः।।** [३२०]

हे जाणत्यांनो, दोषांवर पांघरुण घाला व गुणांचा गौरव करा.

सुभाषिताची पहिली ओळ :

**दृष्टं किमपि लोकेऽस्मिन् न निर्दोषं न निर्गुर्णम्।**

ह्या जगात अत्यंत निर्दोष किंवा अजिबात गुण नाहीत असे काहिही नसते. प्रत्येक वस्तुमात्राच्या ठिकाणी काही दोष व काही गुण असतातच

**नास्त्युत्साहात्परं बलम्।** [३२१]

उत्साहाहून मोठे बळ नाही.

संपूर्ण सुभाषित :

**उत्साहो बलवानार्य, नास्त्युत्साहात्परं बलम्।**
**उत्साहवतां हि लोकेऽस्मिन् न किञ्चितदुर्लभम्।।**

ज्यांच्या जवळ उत्साहरुपी ताकद आहे त्यांना ह्या जगात काहीच कठीण नाही.

**क्रोधो हि शत्रुः प्रथमो नराणां** [३२२]
**देहस्थितो देह विनाशनाय।**
**यथा स्थितः काष्ठगतो हि वह्निः**
**स एव वह्निर्दहते शरीरम्।।**

ज्याप्रमाणे लाकडात असलेला विस्तव लाकडाला जाळून भस्म करतो त्याप्रमाणे मनुष्याला राग जाळून टाकतो.

अती राग अन् भीक माग.

**काञ्चनमणिसंयोगो जनयति नो कस्य लोचनानाम्।।**[३२३]

सोन्याच्या कोंदणात बसविलेले रत्न कोणाच्या डोळ्याला आनंद देत नाही?

पहिली ओळ :

**विद्याविनयोपेता चित्तं नो हरति कस्य मनुजस्य**

सुविद्य विनयी मनुष्य कोणाचे मन आकर्षून घेणार नाही?

**कण्टकेनैवकण्टकम्।**[३२४]

(पृष्ठ ६ वर)

## श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।

दि. दा. औटी

लेख २ रा

**श्रीशैलेशृङ्गे विबुधातिसंगे [१]**
**[२]तुलाद्रितुङ्गेऽपि मुदा[३] वसन्तम्।**
**तमर्जुनं मल्लिकपूर्वमेकं**
**नमामि संसारसमुद्रसेतुम् ।।२।।**

वृत्त - उपेन्द्रवज्रा

पाठभेद - १) विविधप्रसङ्गे २) शेषाद्रि ३) सदा

अन्वय - श्रीशैलशृङ्गे, विबुधातिसङ्गे, तुलाद्रितुङ्गे, मुदा वसन्तं मलिल्कपूर्वम् एकम् अर्जुनं तं, संसारसमुद्रसेतुं (अहं) नमामि।

श्लोकाचा अर्थ व्यवस्थित कळण्यासाठी त्यातले समास सोडविले पाहिजेत. (शैल पर्वत आन्ध्र प्रदेशात, कृष्णा जिल्ह्यात कृष्णा नदी काठी आहे.)

१) श्रीशैलशृङ्गे - श्रीशैलम् इति शृङ्गम् श्रीशैलशृङ्गम विशेषनाम सामान्यनाम कर्मधारय समास तस्मिन्। श्रीशैल पर्वताच्या शिखरावर

२) विबुधातिसंगे - अतिशयितः सङ्ग अतिसङ्ग : कर्मधारय समास। विबुधानाम् अतिसङ्ग : विबुधातिसङ्ग : षष्ठी तत्पुरुष समास। तस्मिन्। ज्या ठिकाणी देवदेवतांचा अनेकवेळा सहवास होता.

३) तुलाद्रितुङ्गे - तुलः इति अभिधानं यस्य सः तुलाद्रिः बहुव्रीहि समास। तुलाद्रिः च असौ तुङ्गः च तुलाद्रितुङ्गः कर्म धारय समास। तस्मिन्। तुल नावाच्या अतिशय उंच पर्वतावर. याला दक्षिण कैलास असेही म्हणतात.

४) संसारसमुद्रसेतुम् - संसारः समुद्रः इव संसारसमुद्रः उपमित कर्मधारय समास। तस्य सेतुः संसारसमुद्रसेतुः षष्ठी तत्पुरुष समास तम्। संसारुपी समुद्र तरुन जाण्याचा सेतू (पूल)च असलेल्या त्याला (म्हणजे श्री शंकराला). (अहं) नमामि। मी नमस्कार करतो.

टीप - श्लोकातील सर्व विशेषणे द्वितीया विभक्तीत योजली आहेत. कारण नम् १ गण परस्मैपद ह्या धातूला द्वितीयेची अपेक्षा असते. ज्याला नमस्कार करायचा त्याची द्वितीया उदा वंदे मातरम्।[२]

५) तमर्जुनं मल्लिकपूर्वम् एकम् - श्रीशंकराचार्यांनी येथे मल्लिकार्जुन असा समास न करता समासाचा विग्रहच श्लोकात घेतला आहे कारण तशी आवश्यकता वृत्त जुळण्यासाठी वाटली असावी. श्रीशैल-शृङ्ग येथे 'म' गण आला आहे (ऽऽऽ) तेथे वृत्तानुसार ज गण येणे (।ऽ।) आवश्यक आहे. संसारसमुद्रावरील सेतु (प्रमाणे - इव) अशी शंकराला उपमा दिलेली असल्याने श्लोकात उपमा अलंकार आहे व इव ह्या अव्ययाचा 'जणूकाही' असा अर्थ घेतला तर 'उत्प्रेक्षा' अलंकार आहे व इव ऐवजी एव हे अव्यय वापरले तर 'रुपक' अलंकार पण होतो.

मल्लिकार्जुन हे नाव कसे प्रचलित झाले या विषयी :- एकदा कार्तिकेय मातेवर रुसून श्रीशैल विभागातील कदली वनात निघून गेला. त्याला शोधण्यासाठी पार्वती त्या वनात गेली व पुढे तेथील आदिवासी भिल्ल लोकातच रमून गेली. नंतर त्या दोघांना शोधण्यासाठी शंकर त्या वनात गेले व त्याचे रुपवती भिल्लीणीवर प्रेम बसले. हे पाहून आदिवासी लोकांनी त्यांचे लग्न त्या भिल्लीणीशी लावून दिले. प्रत्यक्षात ती

पार्वतीच होती. अशारीतीने शंकर आदिवासी लोकांचे 'मल्लिका' (म्हणजे जावई) झाले.

पांडव जेव्हा वनवासात होते तेव्हा व्यासांनी अर्जुनाला उपदेश केला की तू दिव्यास्त्र मिळविण्यासाठी इन्द्रकील पर्वतावर जाऊन इन्द्राला प्रसन्न करुन घे. त्याप्रमाणे केल्यावर इन्द्र प्रसन्न झाला व त्याने अर्जुनाला सांगितले की तू शैल पर्वतावर जाऊन शंकराला संतुष्ट कर.

अर्जुनाने घोर तपश्चर्या केली. त्याचा परीक्षा घेण्यासाठी शंकराने किराताचे (पारध्याचे रुप घेतले) व शिकारीला निघाला त्याने एका रानटी वराहाचा पाठलाग सुरु केला. तो वराह अर्जुनाच्या आश्रमाच्या दिशेने धावत सुटला. अर्जुनाला वाटले हा आपल्यावर चाल करून येत आहे म्हणून त्याने एक तीक्ष्ण बाण त्याच्यावर सोडला. शंकराने सोडलेला बाणही त्याचवेळी वराहाला लागला. शिकार कोणाची यावर शंकर व अर्जुन यात तुंबळ युद्ध झाले व अर्जुनाचा विजय झाला म्हणून शंकराने त्याला 'पाशुपतास्त्र' दिले.

उपरोक्त कथेच्या अनुषंगाने 'मल्लिका' (शंकर) आणि अर्जुन ही नावे एकत्र जोडली गेली व 'मल्लिकार्जुन' हे नाव रुढ झाले.

या कथेवरच आधारित संस्कृत साहित्यातील प्रसिद्ध कवी 'भारवी' याने सहाव्या शतकाच्या पूर्वार्धात 'किरातार्जुनीय' हे पञ्चमहाकाव्यापैकी एक महाकाव्य लिहिले. ह्या काव्याचे १८ सर्ग असून एकूण श्लोकसंख्या १०४० आहे व ह्या काव्यावर सुप्रसिद्ध टीकाकार 'मल्लिनाथ' याने 'घण्टापथ' ह्या नावाची विस्तृत टीका लिहिली आहे. (क्रमशः)

**दि. दा. औटी**

(पृष्ठ क्र. ४ वरून...**संस्कृत सुभाषितांचे अंश, न्याय व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

काट्याने काटा काढावा.

**शतृमुन्मूलयेत्प्राज्ञस्तीक्ष्णं तीक्ष्णेन शत्रुणा।**
**व्यथाकरं सुखार्थाय कण्टकेनैवकण्टकम्।।**

शत्रुद्वाराच शत्रूचा नायनाट करावा.

**न्याय :- अंधगजन्याय** ३२५ - आंधळ्यांनी हत्तीच्या निरनिराळ्या अवयवावरून त्याला निरनिराळा ठरविले. कानावरुन सुपासारखा, पायावरुन खांबासारखा, सोंडेवरुन सापासारखा, शेपटीवरुन दोरीसारखा, पोटावरुन भिंतीसारखा.

एखाद्या गोष्टीबद्दल निश्चित माहिती नसणारे लोक अशारीतीने जेव्हा वर्णन करतात. तेव्हा 'अंधगजन्याय' लावतात.

**अशोकवनिकान्याय** ३२६ - एखादी गोष्ट अमुकच मार्गाने का केली याबाबतीत काहींना वितंडवाद घालण्याची सवय असते. वास्तविक त्याचे उत्तर सोपे असते. उदा. रावणाने सीतेला अशोक वनातच का ठेवले? याचे काय उत्तर देणार? कोठे तरी ठेवायचे ते अशोकवनात ठेवले.

**काकतालीयन्याय** ३२७ - कावळा उडायला आणि फांदी मोडायला एकच वेळ होणे म्हणजे कावळ्याच्या भाराने फांदी मोडली असा अर्थ निघू शकत नाही. एखादी गोष्ट संयोगवशात घडणे.

(क्रमशः)

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

**‘गोमंत पर्वताख्यान’ वृत्त मंदाकिनी**

वेणानदीशी पाहता त्या तापसाची आकृती
वाकोनि दोघे बंधु त्यांना आदराने वंदती
जाणोनि वीरांच्या कथेला राम प्रेमे बोलती
वास्तव्य तुम्ही जा करा गोमंत नामे पर्वती ॥ १॥

शोभा गिरीची रम्यता येई कुणाला वर्णिता
लाजोनि गालां लालिमा अग्रे नभाला चुंबिता
आलिंगण्याला उत्सुकां त्यां वृक्षवल्ली झाकती
वास्तव्य तुम्ही जा करा गोमंत नामे पर्वती ॥२ ॥

नानापरींचे वृक्ष तेव्हा नम्र झाले येथले
सारेच जेव्हा या वनी भारे फळांच्या वाकले
पुष्पे किती वाऱ्यासवे जीजीविषेने डोलती
वास्तव्य तुम्ही जा करा गोमंत नामे पर्वती ॥३॥

आकाशगंगा साजरी शोभे नभी मंदाकिनी
रात्री पडे दृष्टीस साऱ्या तारकांच्या अंगणी
तारे नव्हे ते दीप दैवी योजनेने तेवती
वास्तव्य तुम्ही जा करा गोमंत नामे पर्वती ॥४॥

समृद्ध सारे जे जलाने मेघ येथे जाहले
वर्षोनि ते सारे जलासी ज्या तडागी राहिले
नीलांबुजांच्या त्या तडागी हंसपक्षी पोहती
वास्तव्य तुम्ही जा करा गोमंत नामे पर्वती ॥ ५॥

पक्षीपशू निश्चिंततेने काननी या क्रीडती
स्वातंत्र्यही ऐश्वर्यही एकत्र येथे नांदती
कल्याण होई राहता देतो स्वये मी शाश्वती
वास्तव्य तुम्ही जा करा गोमंत नामे पर्वती ॥६॥

गोमंत पर्वतावर रामकृष्णांचा काल मोठ्या आनंदात व्यतीत होऊ लागला. पण सूडभावनेनं वेडा झालेला जरासंध गोमंत पर्वतापर्यंत रामकृष्णांचा ससैन्य पाठलाग करत आला. त्या दोघा भावांनी पर्वताखाली उतरून उघड्या मैदानात यावं म्हणून त्यानं तो पर्वत सर्व बाजूंनी पेटवून दिला. या विवेकशून्य संहारामुळे क्रुद्ध झालेल्या रामकृष्णांनी मग युद्धात जरासंधाच्या सैन्याचा असा खरपूस समाचार घेतला की जरासंधाला पळता भुई थोडी झाली. जरासंधाचं असं परत एकदा नाक ठेचल्यावर मग ते यादववीर मथुरेला परतले.

मथुरेत त्यांचे दिवस आनंदानं जात होते. वसुदेव देवकीला आता सुनमुख पाहण्याची घाई झाली होती. दरम्यान हस्तिनापुरचा विजयी सम्राट पंडु हिमालयाच्या परिसरात मरण पावला. हस्तिनापूरच्या गादीवर पंडुचा अंध असलेला भाऊ, धृतराष्ट्र, बसला. पंडुची पत्नी, वसुदेवाची बहीण कुंती, ही आपल्या युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव या पाच पुत्रांसह त्याच्या आश्रयाला येऊन राहिली. कृष्णानं मग अक्रूराकरवी धृतराष्ट्राला निरोप पाठवला, पितृनिधनानंतर अनाथ झालेल्या माझ्या आतेभावांचं तू मनोभावे पालन करशीलच पण त्या कार्यात तुला कधी माझी मदत लागली तर ती करायला मी कटिबद्ध आहे. प्रत्यक्ष श्रीकृष्ण आपल्या मुलांच्या पाठीशी आहे हे पाहून बिचाऱ्या कुंतीच्याही जिवात जीव आला!

या काळात कृष्णानं बलरामाकरवी वृंदावनातही प्रीतीसंदेश पाठवून सगळयांची

अत्यंत आपुलकीनं चौकशी केली. श्रीकृष्णाच्या निरंतर सहवासाला जरी आपण मुकलो असलो तरी त्याच्या ह्रदयात आपल्याला कायमचं स्थान मिळालंय ही खातरजमा होऊन त्या साऱ्यांना अगदी धन्य धन्य वाटलं!

कुंडिनपुरचा राजा भीष्मक यानं आपल्या रुक्मिणी नावाच्या चारूशीला आणि चारूगात्री असलेल्या मुलीचं स्वयंवर काढलं. भीष्मकाचा मुलगा रुक्मी जरासंधपक्षीय असल्यानं त्यानं कृष्णाला स्वयंवराचं आमंत्रण केलं नाही. पण कृष्ण रुक्मिणीनं एकमेकांना मनोमनी आधीच वरलं होतं. स्वयंवराला आमंत्रणाशिवाय जाणं रूढीविरुद्ध मानलं जात नसे म्हणून कृष्णही कुंडिनपुरात ससैन्य पोहोचला. भीष्मकाचा नातलग क्रथकैशिक यानं कृष्णाला नुसतं आपल्या शिबिरातच उतरवून घेतलं नाही तर आपल्या राज्याचा राज्याभिषेक करवून कृष्ण अभिषिक्त राजा नसल्याच्या शल्यातूनही त्याची मुक्तता केली. अशा रीतीने कृष्णाचा मार्ग निर्विघ्न होऊन रुक्मिणी त्यालाच वरणार अशी चिन्हं दिसू लागताच जरासंध, शिशुपाल वगैरेंनी स्वयंवर मोडल्याचा ओरडा केला आणि ते आपापल्या राजधानीस निघून गेले.

पण जरासंधानं आपला हट्ट सोडला नाही. म्हणतात ना, जित्याची खोड मेल्याशिवाय कधी जात नाही. आता त्यानं कृष्णाचं पारिपत्य करण्याची अभूतपूर्व तयारी केली. आपल्या मदतीला त्यानं पश्चिमेकडच्या राज्यांतले कालयवन आणि शाल्व हे बलाढ्य राजे घेतले. कालयवन ब्रह्मावर्तात चंचूप्रवेश मिळण्याची संधीच शोधत होता. त्या सर्वांच्या चतुरंग सेना परत एकदा मथुरेच्या दिशेनं वेगानं येऊ लागल्या तेव्हा मात्र कृष्णानं यादवांसह मथुरेचा कायमचा त्याग करून पश्चिम दिशेला समुद्रतीरावर जो प्रदेश वहिवाटलेला नव्हता तिथे नगरी उभारण्यासाठी कूच केलं. समुद्रतीरावर कुशस्थली नामक रहाण्यास योग्य असा प्रदेश पाहून त्यानं तिथे सर्व यादववीरांची तात्पुरती व्यवस्था लावून दिली आणि स्वतः कालयवनाचा समाचार घेण्यासाठी अतिशय वेगाने परत फिरला...

## ‘गनिमी कावा’ - जाती भवानी

श्रीकृष्ण मनी म्हणे विधिलिखित जरी कालयवन<br>मारावा का फुकाच दवडू वाया शक्ती आज<br>वापरू कावा ॥धृ॥<br>मग मरुभूमीच्या पलीकडे तो कालयवनास गाठी ।<br>ललकारी दैत्या आवेशाने करण्या युद्धासाठी ।<br>पण लागलीच तो पळुनी जाई कालयवन येपाठी त्या ।<br>मदोन्मत्त दैत्याला कैसा हरिचा डाव कळावा ॥१॥

ज्या विशाल पर्वतराजींमधुनी कृष्ण सहेतु पळाला ।<br>त्या अवघड भूमीवरुनी दुष्कर प्रवास सैन्या झाला ।<br>त्या समयी सैन्याला युद्धोत्सुक होता असुर म्हणाला ।<br>नियतीचा कौलहि एकलाच मी त्या स्वर्गी धाडावा ॥२॥

श्रीकृष्ण त्वरेने पर्वतराजींमधल्या गुहेत धावे ।<br>हया हेतूने की तेथे मागावर असुराने यावे ।<br>बैसता लपोनी आपण त्याने मुचकुंदास पहावे ।<br>जो राजर्षी त्या गुहेत घेई चिरनिद्रेत विसावा ॥ ३॥

मुचकुंदाने जंव त्रेतायुगात सहाय्य केले देवा ।<br>तंव प्रसन्न होउन देव म्हणाले आता वर मागावा ।<br>मुचकुंद वदे मग एकच देवा मजलागी वर दयावा ।<br>माझी निद्रा हरणारा मज दिसताक्षणी भस्म व्हावा ॥४॥

आधीच असे त्या गुहेमधेही उजेड फारच मंद ।
त्यातून असे तो प्रबल दैत्यही युद्धमदाने धुंद ।
पाहुनी गुहेतिल शांत पहुडला राजर्षी मुचकुंद्र बोलला ।
हरी तू का न करी तव जगदीशाचा धावा ।।५।।

आवळोनि ओष्ठा मुचकुंदा लत्ता निकराची घाली ।
त्या लत्तेने मुचकुंदाची चिरनिद्रा पार पळाली ।
क्रोधाने मुचकुंदाची दृष्टी अग्नी वर्षति झाली ।
तेथे शतसूर्यांचा प्रकाशही अंमळ फिका पडावा ।।६।।

वेधीत असे ती असह्य ज्वाला अचूक अपुल्या लक्ष्या ।
क्षणमात्र न लागे होण्या असुराच्या शरिराची रक्षा ।
भोगीत असा तो कालयवनही गतकर्माची शिक्षा ।
सांगे रसिका तू या गीतातुन बोध कोणता घ्यावा ।।७।।

मुचकुंदानं नंतर पुढे झालेल्या कृष्णाला पाहून आश्चर्यानं विचारलं, हे अत्यंत देखण्या वीरा, तू कोणी स्वर्गीचा गंधर्व तर नव्हेस?

कृष्णानं आपली ओळख करून दिली. त्यावर काहीसं स्मरण करून तो राजर्षी म्हणाला, याचाच अर्थ त्रेतायुगात महर्षींनी भविष्य वर्तवून ठेवलेला विष्णुचा अंश तूच आहेस. तुझ्या दर्शनानं मी धन्य झालो आहे. आता द्वापारयुग संपत आहे ना?

होय राजर्षी. लवकरच कलियुगाला प्रारंभ होईल.

तर मग हे परमात्म्या, मी देहत्याग कसा करावा याविषयी आपण मला काही मार्गदर्शन करावं.

मग कृष्ण म्हणाला, मुचकुंदा, हिमालयाच्या परिसरात प्रायोपवेशन करून तू सदर उपाधीचा त्याग करावास.

मुचकुंदानं ती आज्ञा शिरोधार्य मानली.

कालयवनाचा नाश करून आणि त्याची सर्व संपत्ती घेऊन लगोलग कृष्ण कुशस्थलीला परत आला. जरासंधाची बाजू दुबळी झाल्यानं त्याला आपली तलवार पुन्हा एकदा म्यान करावी लागली.

कुशस्थलीला चहुबाजूंनी संरक्षण करणारा समुद्र, दृष्टीच्या कक्षेत न बसणारा लांबच लांब सागरतीर, तिथे डोलणारे नारळ, सुपारी, केतकी, पन्नाग इत्यादी वृक्ष हे सारं पाहून कृष्ण मनोमनी सुखावला. त्या शनिवारी आकाशात रोहिणी नक्षत्र असताना विद्वान ब्राह्मणांच्या साक्षीनं वसुदेवानं भूमीपूजन करून द्वारकेच्या चिरस्थायी तटाची शिला बसवली.

कृष्णाच्या नेतृत्वाखाली आता द्वारका नगरी वसवण्याच्या कामानं चांगलाच वेग घेतला...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

### तेजस्वी बटूला सर्वांचे आशिर्वाद

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काश्यपाचा सारा वेळ आतां नर्मदेवर गायत्रीच्या पुरश्चरणांत जाऊ लागला. आश्रमात अग्नीची निगा ठेवण्याचे काम पृश्नी करीत असे.

गायत्रीमंत्राच्या जपामुळे काश्यपाचे तेज दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊ लागले. त्याच्या प्रार्थनेने संतुष्ट होऊन सवितादेव खरोखरीच आपले तेज काश्यपाला देत होता असे काश्यपाच्या मुद्रेवरून दिसत होते.

बारा हजार गायत्रीमंत्राचा जप झाल्यावर मग काश्यपाने पृश्नीच्या अनुमतीने मुंजीचा दिवस निश्चित केला.

काश्यपाच्या आश्रमात पाहुणे जमा होऊ लागले.

प्रथम सप्तर्षि आले. मग अनेक सुहृद आले.

मुंज केल्यानंतर काश्यप इतर ऋषींप्रमाणे आपल्या पुत्राला भोगवृत्ति बळावणारे शिक्षण घेण्यासाठी बलिराजाच्या नगरात न धाडता आपल्या आश्रमातच ठेवून त्याच्याकडून वेदाध्ययन करवून घेणार आहे असे समजल्याने ह्या मुंजीबद्दल सर्वत्र कुतुहल निर्माण झाले होते.

ह्या वेळी दैत्यराज बळीची चलती असल्यामुळे देव अज्ञातवासात होते. पण काश्यप पुत्राची मुंज करीत आहे ते खऱ्या अर्थी उप-नयन आहे, ह्या मुंजीने काश्यप पुत्राला वेदांजवळ, खऱ्या ज्ञानाजवळ नेणार आहे, असे कळल्यावर देवांना काश्यपाच्या ध्येयनिष्ठेबद्दल कौतुक वाटले आणि म्हणून तेही आपल्या गणांसह मुंजीला आले.

आश्रमात एकच गर्दी झाली.

एवढ्या प्रचंड समाजाला आपल्याला आत्मीयता वाटत आहे हे पाहून काश्यपाचा आत्मविश्वास बळावला.

मुंजीचा दिवस उजाडला. यज्ञशालेसमोरील विस्तीर्ण पटांगणात मंडप घातला होता. तेथे सारे पाहुणे उपस्थित झाले. सर्वांच्या बोलण्यात काश्यपाबद्दलचा आदर व्यक्त होत होता.

काश्यपाने मुंजीचा संकल्प सोडला आणि गणपतीपूजन, स्वस्तिवाचन, मातृकापूजन, नांदिश्राद्ध वगैरे होऊन त्याने मंडपप्रतिष्ठा केली.

पृश्नीने वामनाला स्नान घालून मंगलतिलक लावला. काश्यपाने त्याला करगोटा बांधला, लंगोटी नेसविली आणि आपल्याजवळ दर्भासनावर बसविले.

आता अग्नीची स्थापना होऊन काश्यपाने समिधांच्या आहुतींनी होम केला. सप्तर्षि त्यावेळी पौरोहित्य करीत होते.

होम झाल्यावर बृहस्पतीने वामनाला यज्ञोपवीत दिले तेव्हा

**ॐ यज्ञापवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत् सहजं पुरस्तात् ।**
**आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः॥**

*विश्वाच्या उत्पत्तिकाली प्रजापतीबरोबरच निर्माण झालेले, यज्ञ करणाराने धारण करावयाचे अत्यंत पवित्र असे हे उपवीत मला उदात्त व निर्मल आयुष्य देवो.*

हे यज्ञोपवीत माझे बल आणि तेज होवो.

हा मंत्र म्हणून वामनाने ते आदरपूर्वक धारण केले.

त्या वेळी त्याचा खणखणीत आवाज आणि शुद्ध स्वर ऐकून सर्वांना त्याचे कौतुक वाटले.

वामन आता द्विज बनला. त्याला वेदाध्ययनाचा अधिकार प्राप्त झाला.

मग अग्नीला समिधा अर्पण करून त्याने होम केला आणि

**श्रद्धां मेधां यशःप्रज्ञां विद्यां बुद्धिं श्रियं बलम्।**
**आयुष्यं तेज आरोग्यं देहि मे हव्यवाहन ।।**

*देवांना आहुति पोचविणाऱ्या हे अग्निदेवा, मला श्रद्धा, धारणाशक्ति, यश, प्रतिभा, विद्या, बुद्धि, पुरुषार्थ, बल, दीर्घायुष्य, तेज आणि आरोग्य दे.*

अशी त्या अग्निनारायणाची प्रार्थना केली. वामनाने केलेला हा पहिलाच होम.

त्यानंतर मंडपाबाहेर नेऊन वामनाला सूर्यदर्शन करविण्यात आले.

आता उपनयनसंस्कारांतील अत्यंत महत्त्वाचा विधि सुरु झाला.

वामनाने पित्याच्या पायांवर मस्तक ठेविले आणि आपल्याला गायत्रीमंत्राचा उपदेश करण्याची त्याला प्रार्थना केली.

तेव्हा बारा हजार गायत्रीमंत्राचे पुरश्चरण केल्याने ज्याचे तेज वृद्धिंगत झाले आहे अशा प्रत्यक्ष सूर्यनारायणाप्रमाणे तेजस्वी दिसणाऱ्या त्या काश्यपऋषीने पुत्राच्या हृदयावर हात ठेवून त्याच्याकडून

**ॐ भूर्भुवः स्वः । तत्सवितुर्वरेण्यम् ।**
**भर्गो देवस्य धीमही । धियो योनः प्रचोदयात् ।**

*आपल्या बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या त्या सवितादेवाच्या अलौकिक अशा तेजाचे मी ध्यान करतो.*

हा गायत्रीमंत्र तीन वेळा हळूहळू म्हणविला.

त्या वेळी सारा सभामंडप चित्राप्रमाणे तटस्थ होता. काश्यप तो मंत्र वामनाला जरी अत्यंत हळू आवाजात सांगत होता तरी सर्वत्र शांत असल्यामुळे मंत्र सर्वांना अगदी स्पष्टपणे ऐकू जाऊन प्रत्यक्ष सवितादेवच आपल्याला गायत्रीचा उपदेश देत आहे असा त्यांना भास झाला.

गायत्र्युपदेश झाल्यावर बृहस्पतीने आपल्या अधिकारवाणीने वामनाला ब्रह्मचर्यव्रताचा आदेश दिला. तो वामनाला म्हणाला,

''हे शिष्या, आता तू ब्रह्मचारी झाला आहेस. तर तू नेहमी अंतर्बाह्य शुद्ध राहा, सकाळ संध्याकाळ अग्नीची पूजा कर, गायत्रीचा जप कर, अध्ययन-अध्यापन अखंडपणे करीत राहा, ज्ञानाखेरीज दुसऱ्या कशाचीही अभिलाषा धरु नकोस आणि रोजच्या निर्वाहापुरत्याच भिक्षेचा स्वीकार कर.''

वामनाने गुरुचा उपदेश अत्यंत विनयपूर्वक ऐकून घेतला आणि बृहस्पतीच्या पायांवर मस्तक ठेवले.

ते दृश्य सर्वांना रोमांचकारी वाटले.

मग वामनाला तिन्ही वेदांचे स्फुरण व्हावे म्हणून काश्यपाने दर्भांची तीन पदरी मेखला, तिची गाठबरोबर बेंबीवर येईल अशा रीतीने वामनाच्या कंबरेला बांधली.

ते दृश्य पाहून पृश्नीच्या नेत्रांत आनंदाश्रु उभे राहिले आणि 'भगवंता, माझ्या बाळाला तिन्ही वेदांत पारंगत कर.' अशी तिने भगवान विष्णूची मनातल्या मनात मनोभावे प्रार्थना केली.

मग भूदेवीने वामनाला कृष्णाजिन दिले, चंद्राने संयमासाठी दंड दिला आणि द्युमातेने छत्र दिले. ब्रह्मदेवाने कमंडलु, सप्तर्षींनी दर्भ, सरस्वतीने रुद्राक्षमाळा आणि कुबेराने भिक्षापात्र दिले.

ह्या सर्व वस्तूंनी विभूषित झालेला तो बटु आता बालरवीप्रमाणे तेजःपुंज दिसत होता. मंडपांतील सर्व पाहुण्यांची दृष्टी त्याच्यावर खिळली होती.

कुबेराने दिलेले भिक्षापात्र हातात घेऊन बटु आता भिक्षेसाठी सिद्ध झाला आणि 'ॐ भवति भिक्षान्देहि।' असे म्हणत त्याने आपले भिक्षापात्र सर्वांपुढे केले.

तेव्हा जगन्माता उमादेवीने वामनाला पहिली भिक्षा घातली.

ती मिळताच आजच्या निर्वाहाला एवढी भिक्षा पुरे आहे असे मानून वामनाने भिक्षापात्र बाजूला नेऊन ठेविले आणि काखेत दंड घेऊन तो सर्वांपुढे नम्रतेने हात जोडून उभा राहिला.

ते पाहून उप-नयम झालेल्या त्या तेजस्वी बटूला सर्वांनी मनःपूर्वक शुभाशीर्वाद दिले.

**नाभाची स्फूर्तिदायक कथा**

दुसऱ्या दिवसापासूनच बटु वामनाच्या अध्ययनाला सुरुवात झाली.

ऋग्वेद हा साऱ्या धर्मशास्त्रांतील आद्यग्रंथ असल्यामुळे काश्यपाने वामनाला प्रथम त्याचेच पाठ देण्यास सुरुवात केली.

वामन पाठ मन लावून ऐके. त्यात तो रममाण होई.

तो एकपाठी असल्याने एकदा कानावरून गेलेले मंत्र त्याला लगेच पाठ होत. त्याची स्मृतिही तल्लख होती. ते पाहून सारे ऋषि आश्चर्याने थक्क होत.

एके दिवशी काश्यप नेहमीप्रमाणे पुत्राला पाठ देऊ लागला. 'ये यज्ञेन दक्षिणया संऽअक्ताः' अशी त्याने सुरुवात केली.

पहिली ऋचा म्हणून झाल्याबरोबर वामन पित्याला म्हणाला, ''तात, हे सूक्त मला ठाऊक आहे.''

काश्यपाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, ''म्हण पाहू.''

वामनाने लगेच ते सूक्त बिनचूक स्वरात घडाघड म्हणून दाखविले.

ह्याला हे सूक्त कसे पाठ झाले ते काश्यपाला कळेना. त्यानं वामनाला म्हटले, ''पुत्रा, तू हे सूक्त कुठे शिकलास? तुला त्याचा पाठ दिल्याच मला स्मरत नाही.''

वामनाने चटकन् उत्तर दिले, ''तात, माझ्या मुंजीच्या वेळी सप्तर्षि वेदघोष करीत होते ना?

त्या वेळी त्यांनी हे सूक्त म्हटलं होतं.''

हे उत्तर देत असता वामनाच्या मुखावर औत्सुक्य दिसत होते. त्याने लगेच काश्यपाला विचारले, ''तात, अयं नाभा वदति वल्गु वः गृहे देवऽपुत्राः ऋषयः तत् शृणोतन। असं त्यात म्हटलं आहे. यज्ञगृहांतील ऋषींना माझं भाषण ऐकाच असं इतक्या ठासून सांगणारा हा नाभा कोण हो? आणि हे यज्ञगृह कुठलं?''

पुत्राच्या तल्लख स्मृतीचे कौतुक करीत काश्यप त्याला म्हणाला, ''पुत्रा, फार चांगला प्रश्न केलास. नाभानेदिष्ठ ह्या नावाचा एक अत्यंत करारी बाण्याचा ऋषि प्राचीन काळी होऊन गेला. त्याने एकदा अंगिरस ऋषींनाही आपल्या तेजस्वी प्रतिभेने दिपवलं होतं.''

वामनाचे औत्सुक्य वाढत गेले. तो पित्याला म्हणाला, ''तात, मला त्याची सारी कथा सांगा ना?''

काश्यपाने मानेनेच होकार दर्शवीत त्याला म्हटले, ''पुत्रा, नाभाची कथा फार स्फुर्तिदायक आहे. सांगतो ऐक.''

असे म्हणून काश्यप नाभानेदिष्ठाची गोष्ट सांगू लागला. तो म्हणाला, ''नाभानेदिष्ठ बरीच वर्ष गुरुगृही विद्यार्जनासाठी राहिला होता. इकडे त्याच्या पाठीमागे त्याचा पिता वृद्ध झाला. तेव्हा त्याने आपली सारी मालमत्ता जवळ असलेल्या पुत्रांना वाटून दिली.

नाभा काही काळाने परत आला. पाहातो तो पित्याने सारा जमीनजुमला भावांना वाटून टाकलेला असून आपल्यासाठी काहीच ठेवलेले नाही !

भावांना विचारता ते म्हणाले, ''पित्याने आम्हाला वाटणी दिलेली आहे. आम्ही आमच्यातल तुला काहीही देणार नाही.''

नाभा म्हणाला, 'पण मग मला काय?''

भावांनी उत्तर दिले, ''तुझ्या वाट्याला वृद्ध बाबाच.'' त्यावर नाभा काय म्हणणार? नाभा पित्याला विचारायला गेला. तेव्हा पिता म्हणाला, ''बाळा, तुझे भाऊ म्हणतात ते खरं आहे. तुझ्या वाटणीला मी काही ठेवलं नाही.''

नाभा मुकाट्याने ऐकत होता.

पिता पुढे म्हणाला, ''पण बाळा, अशी चिंता कां करतोस? अरे, गुरुगृही तू जे शिकला आहेस त्याच मोल ह्या वाटण्यांपेक्षा किती तरी अधिक आहे.''

नाभा म्हणाला, ''होय तात, तुमचं म्हणण मला मान्य आहे. पण आता मी माझा निर्वाह कसा करावा?''

पिता म्हणाला, ''बाळा, सध्या अंगिरस ऋषि सावर्णी राजासाठी एक महायज्ञ करीत आहे. पण सहाव्या दिवशी अवश्य ते मंत्र न सुचल्याकारणाने त्यांचा यज्ञ बंद पडला आहे. त्यामुळे ते मोठ्या विवंचनेत आहेत. तर तू तिथे जा. तू विद्वान आहेस. त्यांना काही मदत करता आली तर पाहा. तुझं कल्याण होईल.''

मग नाभा अंगिरस ऋषींकडे गेला. पित्याने सांगितल्याप्रमाणे खरोखरीच त्यांची अवस्था झाली होती. यज्ञ अर्धवट राहिल्यामुळे

ते मोठ्या काळजीत होते. यज्ञ पुरा न झाल्यास येणाऱ्या संकटाला ते भीत होते.

अध्ययन संपवून गुरुगृहांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या अल्पवयीन नाभाला आपल्या यज्ञांत आलेला पाहून अंगिरसांना प्रथम हसूच आले. आपला बंद पडलेला यज्ञ पूरा करण्याची ह्या पोराची उमेद आहे असे समजल्यावर तर त्यांनी त्याची थट्टाच करण्यास प्रारंभ केला.

पण नाभा डगमगला नाही. उलट त्यांनी केलेल्या उपहासामुळे त्याचे मन अधिकच स्थिर झाले. त्याचा आत्मविश्वास बळावला आणि तो ऋषिंना निश्चयी स्वराने म्हणाला, ''महाराज, मी बालक आहे. आपण मला गुरुस्थानी आहात. गुरुला साहाय्य करणं हे शिष्याचं आदिकर्तव्य आहे. तर उठा, यज्ञवेदीवर बसा आणि आहुति देण्यासाठी सिद्ध व्हा. मी मंत्र म्हणतो.''

नाभाच्या वाणीत प्रभूत्व होते. दृष्टीत अधिकार होता. त्याच्या तेजाने ऋषि दिपून गेले.

एक शब्दही न उच्चारता ते वेदीवर बसले आणि त्यांनी हातात आहुति घेतल्या.

नाभा मंत्र म्हणू लागला. ऋषि आहुति देऊ लागले. सारा यज्ञमंडप चित्राप्रमाणे तटस्थ झाला.

नाभाच्या मंत्रांनी संतुष्ट झालेला अग्नि ऋषींनी दिलेल्या त्या आहुति उत्कंठेने भक्षण करीत आपल्या प्रखर ज्वाला वरवर फेकू लागला.

नाभाने यज्ञ पुरा केला. अंगिरस प्रसन्न झाले.

यज्ञातील दक्षिणेपैकी उलेल्या हजार गाई त्यांनी नाभाला भेट दिल्या.

नाभा त्या हजार गाई घेऊन स्वगृही येऊ लागला. वाटेत त्याला रुद्र भेटला.

गाई पाहून रुद्राने त्याला अडविले आणि दरडावूनच तो नाभाला म्हणाला, ''पोरा, यज्ञातील उरलेल्या दक्षिणेवर माझा हक्क आहे. सोड त्या गाई. त्या माझ्या आहेत.''

गळ्यात मुंडमाळा घातल्यामुळे भयानक दिसणाऱ्या त्या रुद्राच्या दटावणीने कोणीही गर्भगळित झाला असता. पण सत्यनिष्ठ नाभा घाबरला नाही. तो रुद्राला म्हणाला, ''बाबारे, तू कोण आहेस ते मला ठाऊक नाही. पण यज्ञ पुरा केल्याबद्दल अंगिरसांनी ह्या गाई मला दिल्या आहेत.''

आपल्या मानेला हिसडा देऊन रुद्र म्हणाला, ''दिल्या असतील, त्यांना काय? पण गाईवर माझा हक्क आहे.''

नाभा लगेच म्हणाला, ''पण मी तो कां मानावा?''

रुद्राने उत्तर दिले, ''ठीक, तुला आपल्या पित्याचा शब्द तर मान्य आहे ना? मग जा त्याच्याकडे आणि त्यालाच काय तो निर्णय विचार. मी इथेच तुझी वाट पाहातो. माझं नाव रुद्र.''

नाभा पित्याकडे आला. त्याने सारी हकीकत त्याला सांगितली. ती ऐकून पिता त्याला म्हणाला, ''बाळा, रुद्र म्हणतो ते खरं आहे. गाईंवर त्याचाच हक्क आहे.''

नाभा अवाक्षरही न उच्चरता त्याच पावली रुद्राकडे परत आला आणि त्याला म्हणाला, ''बाबारे, तुझं म्हणणं खरं आहे. सांभाळ आपल्या गाई.''

आणि असे म्हणून नाभा मुकाट्याने घराकडे येण्यास निघाला!

पण रुद्राने त्याला थांबविले. तो नाभाला म्हणाला, ''बाळा, तुझ्या पितृनिष्ठेमुळे मी संतुष्ट झालो आहे. ह्या माझ्या गाई मी तुला बक्षीस देतो. जा घेऊन.''

''नाभा रुद्राकडे आ वासून पाहात होता. तो काही बोलणार तोच रुद्र जागच्या जागी गुप्त झाला.''

गोष्ट संपली.

काश्यपाने वामनाकडे शोधक नजरेने पाहिले. वामनाची मुद्रा प्रफुल्लित झालेली होती. त्याच्या नेत्रात नाभाबद्दलचा आदर व्यक्त होत होता.

पुत्राची संस्कारक्षमता पाहून काश्यपाला समाधान वाटले.

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

●●●

एक्कावन्नाव्या वर्षाचा हा पहिला अंक. सर्व सध्दर्म प्रेमी वाचकांचे स्वागत. या अंका सोबत लक्ष्मी पूजन पुजा विधि: (हस्तलिखीत) ही पोथी व मयूर दिप चे रंगीत चित्र देण्यात आले आहे. याची आपण कृपया नोंद घ्यावी. मयूर दिप चे रंगीत चित्र व या पोथीचे सूलेखन आचार्य वसंतराव गोडबोले, पुणे, वय वर्षे ७४ यांनी सध्दर्माचे प्रेमापोटी विनामूल्य करून दिले आहे. या वयातही इतके सुंदर हस्ताक्षर टिकून राहणे ही तर दैवी देणगीच, दुसरे काय म्हणणार?

संपर्क : श्री. आचार्य वसंतराव गोडबोले
१२४, शनिवार पेठ, (नेने घाट), पुणे ४११०३०.
भ्रमणध्वनी ९४२३८५८८२३)

ही भेट सद्धर्मामार्फत आपले एक देणगीदार सभासद श्री. भास्कर देवस्थळे, चिंचवड, पुणे यांनी आपले मातापिता कै. श्रीमती निर्मला मुरलीधर देवस्थळे व कै. मुरलीधर भास्कर देवस्थळे यांचे स्मरणार्थ प्रायोजित केले आहे. ट्रस्ट त्या दोघांचे आभारी व शतश: ऋणी आहे. सद्धर्माच्या सर्व देणगीदार सभासदांना एक प्रत विनामूल्य सप्रेम भेट म्हणून देत आहोत. अधिक प्रती रु. १५/- देणगी मूल्यास प्रती शिल्लक असे पर्यन्त उपलब्ध होतील. मार्च २०१६ पर्यन्त सद्धर्म त्रैमासिकाची दीर्घ कालीन देणगी रु. १०००/- (१५ वर्षासाठी) किंवा कमीत कमी चार वर्षाची देणगी रु. ३००/- पाठविल्यास एक प्रत सप्रेम भेट म्हणून पाठवली जाईल.

**संपादक - कार्यकारी विश्वस्त**

## ‘‘अर्धनारीनटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरूपवर्णन’’

आचार्य वसंत गोडबोले

(उर्वरीत लेख मागील अंकातून पुढे चालू...)

क) कुमारस्वामींनी या तृतीय शिवनेत्रास प्रमस्तक (सेरिब्रम) याचे पीयूष-ग्रंथी (पीनिअल ग्लँड) मानले आहे. ही पीयूष ग्रंथी त्या सर्व ग्रंथींवर नियंत्रण ठेवते ज्यांच्याशी तिचा संबंध येतो/ असतो. या कुमारस्वामींनी पीयूष ग्रंथीला जागृत, स्पंदन करण्याच्या तसेच विकसित करण्याच्या प्रक्रियांचेही विवेचन केले आहे. अध्यात्मसाधनेत ध्यानावस्थेत चेतना केन्द्रीभूत होऊन पीयूष ग्रंथीत स्थिर होते. या अवस्थेत साधक समाधिसुख अनुभवतो. याच अवस्थेत साधकाची योजना व विश्वचेतना तादात्म्य पावते. जीवाशिवाची अनुभूती एक होते. जीवाशिवाची जडते समाधी ती याच अवस्थेत.

याच तिसऱ्या नेत्राने भगवान शंकरांनी कामदेवाचे दहन केले होते. खऱ्या ज्ञानवंतावर कामाचे प्रहार/ आघात कुचकामी ठरतात. एवढेच नव्हे तर खरा ज्ञानी स्वतःचा ज्ञानाग्नीने कामनांना जाळून टाकतो.

७) नटराज :- नटराज शिवाचे नृत्य हे गतिमान सार्वभौम ब्रह्माण्डाचे प्रतीक आहे. चार हात चार दिशांचे (पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण) प्रतीक आहेत. त्रिदेवरूपात नटराज हे एक ब्रह्माण्डनर्तक आहेत व ते भ्रष्ट, लुळ्यापांगळ्या व अपंग झालेल्या ब्रह्माण्डास नष्ट करून ब्रह्मदेवास सृष्टी पुन्हा निर्माण करता यावी यासाठीच नृत्य करतात. या नृत्यासच तांडव म्हणतात, जे प्रलयंकारी मानले जाते. दक्षिण भारतात मात्र यास आनंदतांडव म्हणतात.

शिवतांडव शंकरांच्या क्रोधाचे प्रतीक आहे. यातून त्यांच्या प्रलयंकारी रौद्र स्वरूपाचा बोध होतो. हे रौद्र तांडव करणारे शिव रुद्र आहेत. आनंदतांडव करणारे शिव नटराज आहेत. असे मानतात की आनंदतांडव हे सृष्टीचे अस्तित्व व रौद्रतांडव हे सृष्टीचा विलय दाखविते. या दृष्टिकोनातून हे ब्रह्माण्डाचा उदय/ निर्मिती व विलय दाखविते. याला असेही संबोधतात की हे शिवशंकरांच्या परस्परविरोधी भावाचे प्रतीक आहे. भगवान शंकर हे नटराज या अर्थी आहेत.

भगवान शंकर कामेश्वर, अर्धनारीनटेश्वर असून कामावर विजय मिळविलेले योगी आहेत, गृहस्थी असूनही स्मशानवासी आहेत, आशुतोष व शांत-प्रसन्न-सौम्य असूनही भयंकर रुद्र आहेत, तसेच ते स्थिरावस्था व गतिमान अवस्था यांचेही प्रतीक आहेत.

भगवान शिव बर्फाच्छादित धवल कैलास या गिरिशिखरावर विराजमान आहेत. ते हे दाखविते की ज्ञानाची बैठक विशुद्ध हवी. चारित्र्याच्या शुद्ध, निष्कलंक व धवल बैठकीशिवाय ज्ञानास शोभा नाही. उत्तुंग शिखरबैठक दाखविते की साधकाने जीवनात निश्चित उंची गाठली पाहिजे. कल्याणाचा मार्ग अवघड काटेरी असतो व श्रेयप्राप्तीसाठी अनेक कष्ट घेणे, चढ पार करणे हे करावेच लागते. दुर्दम्य इच्छेने कठीण साधनेशिवाय उच्चतत्त्व वा शिवत्व मिळत नाही व सामान्य गोष्टी त्यागूनच हा अवघड मार्ग क्रमल्याशिवाय

शिवत्वाची दिव्य झळाळी प्राप्त होत नाही.

शंकरांची दिगंबरावस्था म्हणजे ज्यांनी दशदिशांचे वस्त्र परिधान केले आहे, त्यांना वस्त्रात कोण गुंडाळणार? सर्व वस्त्रे अपुरीच पडतील. जे तत्त्व समस्त विश्वास आच्छादिते त्याला आच्छादनाची काय गरज आहे? शंकर भगवान समग्र सृष्टीस व्यापूनही शेष आहेत. त्यांस कोणतेच वस्त्र आच्छादू शकत नाही,

शिवमंदिरात नंदी व कासव असतेच. नंदी शिवाचे वाहन आहे. शिवपिंडीवर सतत जलाभिषेक करणारे अभिषेकपात्र वर टांगलेले असते. शिवपिंडीला भस्मार्चन करतात. शैव नेहमी आडवे गंध लावतात. शिवास बिल्वपर्ण व मंदारपुष्पे प्रिय असतात. चित्रात ते गजचर्मधारीही दाखवतात. रुद्राक्ष शंकराच्या अश्रूंतून निर्माण झाले असे सांगतात व शरीरावर रुद्राक्ष धारण करतात. जपास रुद्राक्षमाळ वापरतात. रुद्राक्ष पूजेतही ठेवतात. रुद्राक्षजल हे औषधीसारखे वापरतात इ.इ. ही सर्व शिवाशी निगडित आहेत, एवढेच येथे लिहितो. शिवमंत्र, स्तोत्रे, कवच इ.इ. व ग्रंथ - शिवपुराण, शिवलीलामृत इ. येथे उल्लेख करत नाही. हे सगळे वेगळे विषय आहेत. त्यावर पुढेमागे स्वतंत्र लेख लिहिण्याचा मानस आहे.

लेखान्ती उपनिषदातील खालील उल्लेख करतो -

''रुद्रो नर उमा नारी तस्मै तस्यै नमो नमः।
रुद्रो ब्रह्मा उमा वाणी तस्मै तस्यै नमो नमः।
रुद्रो विष्णु उमा लक्ष्मी तस्मै तस्यै नमो नमः।

रुद्र सूर्य आहेत, उमा त्यांची प्रभा; रुद्र फूल आहेत, उमा त्यांचा सुगंध; रुद्र यज्ञ आहेत, उमा त्यांची वेदी; रुद्र पुरुष आहेत, उमा त्यांची प्रकृती इ.इ. पुनश्च लेखारंभी लिहिलेला श्लोक लिहून लेखसमाप्ती करतो व हा लेख त्या देवाधिदेव महादेव शंकर भगवानांना अर्पण करतो.

''नमः शिवाभ्यां नवयौवनाभ्यां
परस्पराश्लिष्टवपुर्धराभ्याम्।
नगेन्द्रकन्या-वृषकेतनाभ्यां नमो नमः शंकर-पार्वतीभ्याम्।''

''कल्याण करणाऱ्या, नवयौवनयुक्त, परस्पर आलिंगित शरीर असलेल्यांना नमस्कार, वृषभचिन्ह ज्याच्या ध्वजावर आहे अशा शंकराला व पर्वतकन्येला वारंवार नमस्कार.''

- इत्यलम्

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

## रामः अस्माकं मनः पातुं ।।
## (राम आमच्या मनाचे रक्षण करो)

डॉ. अतुल सुभाषराव निरगुडे

भक्तीमार्गामध्ये रामरक्षा हे स्तोत्र महत्वपूर्ण आहे. रामरक्षा हा भगवान श्री शंकरांनी ऋषीवर श्री बुधकौशिकांना दिलेला प्रसाद आहे. निर्विकल्प समाधी अवस्थेत ऋतुंभरा प्रज्ञेने द्रष्टयत्व सूत्रांना श्री बुधकौशिकऋषींनी शब्दबध्द केले.

**आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः ।।**
**तथा लिखितवान् प्रातः प्रबुध्दो बुधकौशिकः ।।**
(रामरक्षा)

**रामावतार निश्चिती**

महर्षी वाल्मिकींनी रामायणाची रचना करुन आपणांस उपकृत केलेले आहे.

**कूजंते रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।**
**आरूह्य कविताशाखां वंदे वाल्मीकि कोकिलम्।।**
(रामरक्षा)

कवितारूपी वृक्षाच्या फांदीवर बसून 'राम राम' अशा मधुराक्षरांचे कूजन करणाऱ्या 'वाल्मिकी रूपी' कोकिळेस मी वंदन करतो. असे श्री बुधकौशिकऋषी म्हणतात.

रामजन्मभूमी संदर्भातील न्यायालयीन निर्णयामुळे रामावतार ही कवी कल्पना असण्याची समजूत विरघळून जाईल. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या बहुप्रतिक्षित व ऐतिहासिक निर्णयामूळे अनेक बाबींवर प्रकाश पडलेला आहे. सर्वप्रथम या न्यायालयाने प्रभू श्री रामचंद्रांचे अवतारकार्य स्विकारलले आहे. तसेच त्यांचे जन्मस्थान सुनिश्चित केलेला आहे. यावर सर्व न्यायाधिशांचे एकमत आहे. सर्व निकालपत्र एकुण ५००० पृष्ठांचे आहे असे वाचनात आले. यावरुन हा निकाल केवळ भावनिक मुद्यांवर दिला गेलाय अशा अडाणी वाटणाऱ्या पण धूर्त असणाऱ्या प्रतिक्रियांना काहीही अर्थ उरत नाही.

**पू. श्री जनार्दनस्वामीजी ।**

नागपूर (महाराष्ट्र) स्थित ब्रह्मलीन, संन्यासी, योगप्रचारक, परम पूजनीय परमहंस परिव्राजकाचार्य श्री जनार्दन स्वामींजी यांचे प्रदीर्घ चरित्र प्रज्ञाभारती कै. श्री श्री भा. वर्णेकरांनी मराठीत शब्दबध्द केलेले आहे. त्यामध्ये स्वामीजींच्या नर्मदापरिक्रमेचे वर्णन आलेले आहे. परिक्रमेत सायंकाळी स्वामीजींची प्रवचने होत असत. एके दिवशी त्यांनी रामरक्षेतील खालील सूत्रावर प्रवचन केले.

**सनध्दः कवची खड्गी चापबाणधरोयुवा ।**
**गच्छन् मनोऽरथोऽस्माकं रामःपातु सलक्ष्मणः ।।**
(रामरक्षा)

रामरक्षेच्या उपलब्ध प्रायः सर्व पाठांमध्ये मनोऽरथोऽस्माकं या शब्दातील पहिला अवग्रह (ऽ) आढळत नाही. त्यामुळे मनोरथ असा त्याचा अर्थ घेतला जातो. स्वामीजींनी दोन्ही अवग्रहाच्या असण्यावर भर दिलेला आहे. दोन अवग्रहयुक्त सूत्राचा अन्वय पुढीलप्रमाणे होतो.

**सलक्ष्मण गच्छन् रामः अस्माकं मनः पातु।**
**अ-रथः स-लक्ष्मणः**

अर्थ - रथाशिवाय लक्ष्मणासोबत गमन करणारा राम आमच्या मनाचे रक्षण करो।

पातु शब्दाचे रक्षण व पालन (पोषण, संवर्धन, संस्करण ) असे अर्थ अपेक्षित आहेत. पालन शब्दाने सुसंस्कारित मननिर्मिती अपेक्षित आहे.

**मुद्रित अशुध्दीची अन्य उदाहरणे**

मुद्रित अशुध्दींमुळे अनेक गडबडी होतात. मुद्रित अशुध्दींना उपसंपादकाची डुलकी असे सुध्दा म्हणतात.

**शुभं करोतु कल्याणं आरोग्यं सुख संपदा।**

या दीप प्रार्थनेमध्ये सुखं शब्दाऐवजी धन शब्द छापला गेला व तोच आता रुढ आहे. धन व संपदा हा पुनरुक्ती दोष आहे. शिवाय ही संपदा सुख देत नसेल तर ती निरुपयोगी ठरेल.

**अहल्या**

लोकसत्तेच्या लोकमानसमध्ये (१३ मार्च २०१०) एका वाचकाचे पत्र प्रसिध्द झालेले आहे. त्यात अहल्या शब्दावर चर्चा आहे. अहिल्या हा शब्द अशुध्द आहे. अह म्हणजे नांगर. अहल्या याचा शब्दश: अर्थ नांगरता न येण्याजोगी (जमीन)असा आहे. गौतम ऋषींची पत्नी ही भूमातेसारखी होती म्हणून तिचे नाव अहल्या होते. गौतमांच्या शापामुळे तिचे दगडात रूपांतर झाले व प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने तिला मूळ रूप प्राप्त झाले. अहल्या या शब्दाचा अंतरार्थही लक्षात घ्यायला हवा.

अनसूया हा शब्द असाच अनुसुया किंवा अनुसया असा उच्चारिला / छापला जातो. अन - असूया म्हणजे कोणाविषयीसुध्दा असूया (मत्सर इ.) न बाळगणारी.

**अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा।**
**पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम्॥**

येथे पंचकं ना ऐवजी पंचकन्या असे छापले जाते. ते अशुध्द आहे. येथे ना हे प्रथमा विभक्तीचे एकवचन आहे. याचे अनेक अर्थ आहेत. पण या श्लोकाच्या दृष्टीने तीन अर्थ असे (१) व्यक्ती (स्त्री / पुरुष ) (२) पुरुष (३) कुमारिका (१० ते १२ वर्षे वयाची तरुण मुलगी, पवित्र स्त्री, मुलगी, अविवाहित मुलगी, स्त्री जात) हे अर्थ पाहिले असता मुळ श्लोकामध्ये पंचकन्या हा शब्द नाहीच. या पाच निष्ठावान व पवित्र स्त्रियांचे नित्य स्मरण केले असता महापातकाचा नाश होतो असा अर्थ संभवतो.

**मन**

**खदिन्यात्मामनः कलौ दिशश्च द्रव्यसंग्रहः।**
(चरकसंहिता)

अकाश इ. पंचमहाभूते, आत्मा, मन, काल व दिशा ही सृष्टीच्या निर्मितीची नऊ कारण द्रव्ये आहेत. एकादश इंद्रिये म्हणजे पंचज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये व अकरावे उभयात्मक इंद्रिय म्हणजे मन.

**इंद्रियाणं मनश्चास्मि।** (गीता)

आपल्या विभूती सांगताना गीतेमध्ये

भगवंत म्हणतात सर्व इंद्रियामध्ये मन तो मी आहे.

**मनाचे विषय**

**चिंत्यं विचार्य उह्यं च ध्येयं संकल्प्यमेव च ।**
(चरकसंहिता)

चिंत्य म्हणजे योग्य स्मरण किंवा चिंतन विचार्य म्हणजे योग्य अयोग्य विचार. उह्य म्हणजे युक्तीपूर्वक केलेले ऊह व अपोह. ध्येय म्हणजे ज्याचे ध्यान केले जाते (किंवा ज्याचा ध्यास लागलेला असतो ते). कर्तव्य अकर्तव्यचा विचार करून निर्णय घेतले जातात. त्यास संकल्प्य म्हटले जाते. सृष्टीचे कारण द्रव्य, त्याचे विषय तसेच भगवंतांची विभुती असल्यामुळे मनाचे महत्व अधोरेखित होते. त्यामुळेच प्रभु श्री रामचंद्रांना शरण जाऊन त्यांना आपल्या मनाचे रक्षण करण्याची प्रार्थना करावी लागते.

**मकार दश चंचल:**

अर्जुनाचे एक नाव गुडाकेश असे आहे. गुडाकेश म्हणजे निद्रेवर विजय मिळविलेला. आम्ही निद्रावश असतो, सामान्य माणसांवर निद्रा केंव्हाही स्वार होऊ शकते. अर्जुन मात्र स्वत:च्या इच्छेनुसार निद्रा उपभोगू शकत असे. असा अर्जुन भगवंताला गीतेमध्ये विचारतो.

**चंचल हि मन: कृष्ण प्रमाथि बलवत्-दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥**
(गीता ६/३४)

हे कृष्ण, मन खूप चंचल आहे. क्षोभकर, बलवान व दृढ आहे. त्याचा निग्रह करणे वायुनिग्रह करण्याएवढे कठिण आहे.

**मनाचा विषाद**

**विषादो रोगवर्धनानाम् (श्रेष्ठ:) ।**
(चरकसंहिता)

चरकाचार्यांनी मनाचा विषाद हा रोगवर्धक करणांमध्ये श्रेष्ठ आहे असे म्हटलेले आहे. विषाद म्हणजे खेद, खिन्नता, अप्रसन्नता, नैराश्य इ. श्रीमत् भगवतामध्ये नारदांचा आणि सनतकुमारांचा एक संवाद झालेला आहे. कलीयुगाचे वर्णन करताना ते म्हणतात.

**इहं संतो विषीदन्ति प्रहाष्यंति-हि-असावध:**
(श्रीमत भागवत)

कलीयुगामध्ये सरळमार्गी सज्जनाना विषाद निर्माण होतो व अ-साधु म्हणजे दुर्जन असतील ते आनंदी, उल्हासित असतील. मध्यंतरी पूजनीय शंकराचार्यांना भर दिवाळीमध्ये अटक केली गेली. खतरनाक, राष्ट्रविघातक अतिरेकी अजमल कसाब याला पंचातारांकित व्यवस्था मिळत होती. अशा परिस्थीतीमध्ये सज्जनांच्या मनाचे रक्षण करण्याची प्रार्थना श्रीरामाच्या चरणी करणे एवढेच हाती असते.

**राजा कालस्य कारणम्**

महाराज युधिष्ठीरजींचा विषाद घालविण्यास गोपालकृष्ण शरपंजरी पडलेल्या भीष्माचार्यांकडे त्यांना घेऊन गेले. त्यावेळी भीष्माचार्यांनी जो उपदेश केला त्यास महाभारतात शांतीपर्व म्हटले जाते. त्यात एका प्रश्नाच्या उत्तरामध्ये आचार्य भीष्म म्हणतात.

**कलौ वा कारणं राज्ञ: राजा वा काल कारणम्**
**इति ते संशयो माभूत राजा कालस्य कारणम्**

काळ म्हणजे परिस्थितीस राजा जबाबदार असतो. हा सिध्दांत आहे. विद्यमान भ्रष्ट राज्यशासन, चारित्र्यहीन लोकप्रतिनिधी, भ्रांत विचारवंत, कर्तव्यच्युत अधिकारी अशा दुश्चरित्र राज्यकर्त्यांमुळे कलीयुगाचा दुष्प्रभाव आणखी गहन होत आहे. अशा परिस्थितीमध्ये भगवत भक्तांना आनंदी वृत्ती ठेवणे कठीण आहे. प्रभू श्रीराम हे पूर्ण आनंद, शाश्वत आनंदाचे सक्षम दाते आहेत. ते आमच्या मनाचे रक्षण करोत.

**मनाची प्रसन्नता**

आयुर्वेदामध्ये स्वस्थ व्यक्तीची व्याख्या केलेली आहे.

**समदोष: समग्निश्च समधातु मलक्रिया:**
**प्रसन्नंआत्मा-इंद्रिय-मन: स्वस्थिमत्यभिधियते॥**

(सुश्रुत संहिता)

स्वस्थ व निरोगी शब्दांमध्ये सुक्ष्म फरक आहे.

Signature & Augograph यांच्यात जसा फरक आहे तसा कोणताही रोग नसणे म्हणजे निरोगी. स्वस्थ शब्द खूप व्यापक आहे. दोष, धातु, मल, अग्नि, आत्मा इंद्रीये व मन प्रसन्न असणारा तो प्रसन्न. मनाची प्रसन्नता स्वस्थ व्यक्तींमध्ये अभिप्रेत आहे.

**दु:ख सहिष्णुता**

मनामध्ये प्रसन्नता रहावी, विषाद नसावा यासाठी मनाचे दु:ख सहन करण्याचे सामर्थ्य वाढणे आवश्यक असते.

भारतीयांच्या मनाची दु:ख सहन करण्याची क्षमता वरचे वर कमी होत आहे. आत्महत्यांचे व वैफल्यग्रस्तांचे प्रमाण वाढत आहे, हा राष्ट्रीय चिंतेचा विषय आहे.

**लाघवं कर्म सामर्थ्यं स्थैर्यं दु:ख सहिष्णुता**
**दोषक्षयोऽग्निवृध्दिश्च व्यायामादुपजायते**

(चरकसंहिता)

**दु:ख सहत्वे स्थैर्यार्थे व्यायाम:** (अग्र्य:)

(अष्टांगहृयसंहिता)

**व्यायाम प्रकार -**

दररोज व्यायाम करण्याचे फायदे सांगताना दु:ख सहिष्णुता सांगितलेली आहे. त्यासाठी दररोज व आपल्या क्षमतेनुसार व्यायाम (शारीरिक खेळ व कष्टदायक हालचाली इ.) करणे आवश्यक आहे. रामभक्त हनुमान हे व्यायाम व बलोपासनेचे आदर्श आहेत. दास्यभक्ती मध्ये व्यायामाची अनिवार्यता मारुतीरायांची सूचित केलेली आहे.

**रघुकुलटिळकरामदास**

समर्थ रामदास स्वामींनी स्वत: व्यायाम उपासना केली व लोकांकडून करवुन घेतली. व्यायाम उपासनेने प्रभु श्रीराम संतुष्ट होतील व आपणास दु:खसहिष्णुतेचा प्रसाद देतील.

**मनसखा वायु: ।**

**पवनो बध्यते येन मनस्तेनैव वध्यते ।**
**मनश्च बध्यते येन पवनस्तेन बद्दाते ।।**

(हठयोग प्रदीपिका )

ज्या प्रक्रियांनी वायुचा निग्रह होतो त्याच क्रियांनी मनाचा निग्रह होतो व मनाचा निग्रह ज्या

क्रियांनी होतो त्याद्वारेच वायुचा निग्रह संभवतो. अष्टांग योगातील प्राणायाम इ. साधना मन-निग्रह (बध्द, आत्मस्थ) करण्याचा सुलभ मार्ग आहे.

**आहारशुध्दौ सत्वशुध्दि: ।**

छांदोग्योपनिषदामध्ये उपरोक्त सिध्दांत आलेला आहे. मन अन्नमय आहे ही छांदोग्य श्रुती आहे. साधनेमध्ये आहाराला खूप महत्व आहे.

**सत्वं उच्यते मन: । (चरक)**

सत्व म्हणजे मन. शुध्द अन्न सेवनाने शुध्दमनाची जोपासना होते. आहार सामग्री कशी व कोणती असावी, पाकक्रिया कशी असावी केंव्हा खावे, किती खावे, कसे खावे इ. बाबी खूप महत्वाच्या आहेत. गीतेच्या सतराव्या अध्यायात सात्विक , राजस व तामस आहाराचे वर्णन आलेले आहे.

**यातयामं गतस्सं पूति पर्युषितं च यत्**
**उच्छिष्टं च अपि अमेध्यं भोजनं तामसप्रियम्**
( गीता १७/१० )

पूति म्हणजे ज्यातून दुर्गंध येत आहे असे अन्न. बेकरीच्या आसमंतात हा गंध अनुभवता येतो. पर्युषित म्हणजे शिजविल्यानंतर शिळे, रात्र उलटून गेलेले अन्न. पाव, बिस्कीटे, जंक फुड ही त्याची ढोबळ उदाहरणे आहेत. प्रात:स्मरणीय पूजनीय गुरुवर्य श्री गुण्डा नारायणमहाराज सिध्दरस, पंढरपूर यांचे आहारशुध्दी द्वारे सत्वशुध्दीसाठी आग्रही, प्रतिपादन असते. उपरोक्त सूत्रामधील या शब्दांवर ते भक्तांचे ध्यानाकर्षण करतात.

असा (राजस व तामस) आहार प्रिय असणे, तो आवडणे, त्याचे आकर्षण असणे हे अधिक अडचणीचे ठरते. प्रत्येक घासासोबत श्रीरामांचे स्मरण होणे सात्विकता वृध्दींसाठी आवश्यक असते.

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहामाश्रित:**
**प्राणापानं समायुक्त: पचाम्यन्नं चतुर्विधम्**
(गीता १५)

अन्न स्वत:च परब्रम्ह आहे. त्याला उदरस्थ परब्रम्हाला अपर्ण करणे ही भारतीय भोजन विधीची उच्चतम धारणा आहे. मनुष्य मात्रांच्या उदरामध्ये असलेला वैश्वानल (अग्नि) तो मी आहे. चतुर्विध अन्नाचे मी पचन करवितो असे भगवंत सांगतात. या भूमिकेने आहार सेवन करायला हवा. आहाराच्या सुक्ष्मतम पोषकोशांनी मनाचे पोषण होते. अशा सुपोषित मनाने समाज, राष्ट्र व धर्म यांचे पोषण उत्तम होईल ही सुध्दा इश्वरभक्ती आहे.

**संक्षेपत:**

मनामध्ये विषाद राहू नये, मन प्रसन्न असावे, त्याची दु:खसहिष्णुता वाढावी, आहारशुध्दी मुळे सत्वशील मननिर्मिती व्हावी, यासाठी प्रभु श्री रामचंद्रांनी आमच्या मनाचे रक्षण, पालन पोषण व सुसंस्करण करावे अशी प्रार्थना आपण नित्य करावी.

**जय श्रीराम**

**डॉ. अतुल सुभाषराव निरगुडे**
भद्रायु आयुर्वेद चिकित्सालय,
लातूर

जीवनाच्या महत्त्वाच्या वळणावर अशी एखादी व्यक्ती भेटते की आपल्या जीवनाला एक नवी दिशा मिळते, प्रेरणा मिळते. भातखंडे सरांशी झालेला माझा परिचय ही अशीच, आयुष्याला नवी दिशा देणारी घटना होती.

१९८९ साली श्री. मधुकर कुलकर्णी (सरांचे व्याही) यांनी 'संस्कृतचे अभ्यासक' म्हणून सरांशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर अधूनमधून मी संस्कृत विषयातील कठीण श्लोक इ. समजून घेण्यासाठी सरांकडे जात असे. त्यानंतर काव्यप्रकाश, षटदर्शने इ. बी. ए. पदवीचे विषय तसेच एम. ए. पदवीसाठी शांकरभाष्याचा काही भाग हे विषय सरांनी मला शिकविले आणि म्हणता म्हणता सर आणि काकू (सरांच्या पत्नी) यांच्याशी माझे ऋणानुबंध जुळले ते अखेरपर्यंत कायमचेच.

कधीतरी सरांच्या बोलण्यातून समजले त्यानुसार मातापित्यांचे छत्र हरपल्याने लहान वयातच त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी पडली. नोकरी करणे अनिवार्य होते परंतु सरांचा पिंड मुळात अभ्यासकाचा, त्यामुळे विद्यापीठात नोकरी करता करता, अतिशय मेहनतीने त्यांनी संस्कृत विषयात बी. ए., एम्.ए., पीएच्.डी. या पदव्या प्राप्त केल्या. एम्.ए. पदवीसाठी महनीय -'झाला वेदान्त' हे पारितोषिक, लघुप्रबंधासाठी 'विश्वनाथ मांडलिक सुवर्णपदक' हे सन्मानही त्यांनी प्राप्त केले. ज्ञानाची त्यांची आस कधी संपली नाही आणि वाचन, संशोधन, लेखन, अध्यापन यांची कास त्यांनी कधी सोडली नाही. आपले ज्ञान विद्यार्थ्यांना दोन्हीकरांनी भरभरून देण्यात सरांना अत्यंत आनंद मिळत असे. त्यामुळेच संसार, नोकरी, संशोधन, लेखन याबरोबरच सुमारे ३५-४० वर्षे सर विविध वयोगटाच्या लोकांसाठी सतत अध्यापन करत होते. विद्यार्थी शालेय असो. महाविद्यालयीन असो वा त्यांच्या अध्यात्म-संवाद वर्गातील असो, सरांची अध्यापनातील आत्मीयता तितकीच असे. सुरुवातीच्या काळात सर इंग्रजीही शिकवत. परंतु संस्कृत भाषेवरील त्यांचे प्रेम अलौकिक होते. सरांनी जणू अखंड ज्ञानयज्ञाची दीक्षा घेतली होती. या ज्ञानयज्ञाने शुचिर्भूत झालेले सरांचे घर म्हणजे आम्हा विद्यार्थ्यांसाठी जणू तीर्थक्षेत्रच होते.

मी सरांकडे शिकत असताना सर विद्यापीठात रजिस्ट्रार पदाचा भार सांभाळत होते. रात्री ९ वाजता घरी आल्यानंतर ते मला संस्कृत शिकवत. त्यांचा अध्यापनातील उत्साह, आत्मीयता पाहून मी स्तिमित होत असे. खर तर अभ्यासक्रमातील थोड्याच गोष्टी मी सरांकडे शिकले. परंतु अभ्यासक्रमा पलिकडील ज्ञानक्षेत्राच्या आणि जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या ज्या गोष्टी त्यांच्याकडून मला शिकायला मिळाल्या त्यांची शिदोरी मला आयुष्यभर पुरेल.

'स्वामिन् तव शरणम्', 'सद्धर्म', 'योगतरंग' या तसेच इतर अनेक

नियतकालिकांसाठी सरांनी विपुल लेखन केले व तेही निःस्पृह, निरपेक्ष वृत्तीने. नंतर सरांनी मलाही या मासिकांसाठी लेखन करण्याची प्रेरणा दिली. माझ्याकडून विविध विषयांवर लेख लिहून घेतले. लेख लिहिला की तो सरांना वाचून दाखवायचा, सरांनी केलेल्या सूचना लक्षात घेऊन, आवश्यक बदल करून लेखाला अंतिम स्वरुप द्यायचे हा आमचा परिपाठ अखेरपर्यंत चालू राहिला. लेखाच्या विषयाला धरून केलेली सुस्पष्ट विचारांची मांडणी, नेमके शब्द, सुटसुटीत वाक्यरचना आणि वाचता क्षणी समजेल अशी प्रासादिक शैली ही सरांच्या लेखनाची चतुःसूत्री आम्हा विद्यार्थीनींच्या लेखनातही आपोआप उतरली. लेख असो वा पुस्तक सरांचे लेखन इतके नेमके व सोपे असे की 'हे तर मलाही लिहिता येईल' असा विश्वास वाचकाच्या मनात निर्माण व्हावा. परंतु काही वाक्य मात्र अशी असत की त्यांना सरांच्या प्रतिभेचा विशेष स्पर्श असे.

लेखनाच्या क्षेत्रात ज्याप्रमाणे सरांनी आम्हाला पुढे नेले तसेच वक्तृत्वातही. सर अनेक ठिकाणी व्याख्यानांसाठी जात असत. योग्य वेळी योग्य ठिकाणी वक्तृत्वासाठी सर आम्हा विद्यार्थीनीची नावे सुचवत. माझ्या वक्तृत्वाचा प्रारंभ सरांच्या 'विश्वमोहिनी गीता' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात सरांच्या पुस्तकाचा परिचय करण्याच्या निमित्ताने झाला. शिष्यातील गुणावगुण शिष्यापेक्षा गुरुच अधिक जाणतात. माझ्या लेखन-वक्तृत्वाविषयी माझ्यापेक्ष अधिक विश्वास सरांना होता.

काही मासिकांची मुद्रिते सरांकडे तपासण्यासाठी येत. हळूहळू मुद्रिते तपासण्याचे तंत्र, त्यातील विशिष्ट खुणा सरांनी मला शिकविल्या. सरांच्या विविध विषयांवरील अनेक पुस्तकांची मुद्रिते पाहताना, मुद्रिते तपासण्याच्या तंत्राबरोबरच पुस्तक लेखन कसे करावे याचा वस्तुपाठ कळत नकळत मला मिळत गेला. नंतर तर सहलेखिका म्हणून सरांबरोबर 'चला, संस्कृत शिकू या' आणि शंकराचार्यांचे योगदान ही पुस्तके लिहिण्याची अपूर्व संधी मला प्राप्त झाली. 'लिहिते व्हा' या सरांनी वारंवार केलेल्या उपदेशाचेच हे फलित आहे. आपल्या विद्यार्थीनींची स्वतंत्र पुस्तके प्रकाशित व्हावी अशी त्यांची मनापासून इच्छा ते वारंवार बोलून दाखवत. 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' अशी इच्छा असणारे वेगळेच.

अनेकांना सरांनी संस्कृत व इतर विषयांत मार्गदर्शन केले पण कोणतीही अपेक्षा न ठेवता. अपेक्षा असेल तर इतकीच या विद्यार्थ्यांनी पुन्हा पुन्हा पुन्हा त्यांच्याकडे यावे त्यांना भेटावे. खरोखरच ते शिष्यांचे 'चित्तापहारी' (चित्त आकर्षून घेणार) गुरु होते.

संस्कृत आणि तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास अभ्यासातील बोलण्यातील अचूकता वेळेचे व्यवस्थापन व काटेकोरपणा राहणी आणि व्यक्तिमत्वात भिनलेली शिस्त, क्षमाशीलता, निःस्पृह वृत्ती, आंतर्बाह्य शुचिता या त्यांच्या गुणांचा स्वाभाविक परिणाम म्हणजे अध्यात्म शिक्षण, प्रकाशन, व्यवस्थापन इ. विविध क्षेत्रातील तसेच विविध संस्थांतील प्रमुख व्यक्ती त्यांना भेटायला, त्यांचे मार्गदर्शन घ्यायला येत असत. 'गुणा कुर्वन्ति दूतत्वं अपि वसतां सताम्' (सज्जनांचे गुणच त्यांचे किर्ती सर्वत्र पसरवतात) हे वचन सरांच्या बाबतीत अगदी सत्य ठरलेले.

सरांकडे सातत्याने जाण्याचा माझा व्यक्तिगत लाभ म्हणजे या व्यक्तींशी माझाही परिचय झाला.

या सगळ्या प्रवासात सरांशी आणि काकूंशी मनाच्या तारा इतक्या जुळल्या की जणू जन्मोजन्मीचे ऋणानुबंध. यामुळेच असेल कदाचित की अनेकदा व्यक्तिगत निर्णय घेतानाही मी सरांचा आणि काकूंचा सल्ला घेतला आहे. शांत आणि संयत अशा त्यांच्या सल्ल्यांनी माझा नित्य उत्कर्षच झाला आहे. आजही एखाद्या प्रसंगी निर्णय घेताना 'या क्षणी सर असते तर त्यांनी काय केले असते' असा विचार मला योग्य निर्णयाप्रत नेतो आणि माझी समस्या सहज सोडवितो. वेगवेगळ्या प्रसंगी सरांनी सांगितलेली काही वाक्ये तर मनावर कोरली गेली आहेत. जसे भगवद्‌गीतेतील 'नियंत करु कर्म त्वम्', योगवासिष्ठातील 'मनस्तु महदस्तु ते', तत्त्वज्ञानातील 'कृतकर्मक्षयो नास्ति' ही कर्तव्याची जाणीव करून देणारी आणि आशावाद निर्माण करणारी वाक्ये. कधी एखादी गोष्ट विसरली की 'Fogetting is Youth' हे गमतीच्या स्वरात म्हटलेले वाक्य आणि अशी अनेक वाक्ये.

आजही एखादा लेख असेल वा कुठे व्याख्यान द्यायचे असेल तर वाटते पटकन् सरांकडे जावे आणि लिहिलेले एकदा वाचून दाखवावे. पदोपदी सरांची आठवण येते. सर आता नाहीत म्हणून खिन्नता वाटते पण असेही वाटते की मी किती भाग्यवती की विचारांची न संपणारी शिदोरी सरांनी मला दिली आहे जी जन्मोजन्मी पुरून उरेल.

या लेखात काकूंचा निर्देश नसेल तर हा लेख अपूर्ण राहील. काकू म्हणजे सरांची शक्ती होती आणि काकूंची सरांवर नितांत भक्ती होती. सरांच्या प्रत्येक कामात काकूंचा मानसिक, नैतिक, सर्वार्थाने सहभाग असे. सरांना साजेशाच त्यांच्या या अर्धांगिनी होत्या. कित्येक संस्कृत श्लोक, स्तोत्र इतकेच काय पण संपूर्ण मेघदूत काकूंना पाठ होते. सर शिकवत असलेले तत्त्वज्ञान काकूंच्या नसानसात मुरले होते. 'सुहासिनी' या नावाप्रमाणे सदैव हसतमुख समाधानी असणाऱ्या, गंगाजलाप्रमाणे आंतर्बाह्य शुद्ध मनाच्या, प्रेमळ, क्षमाशील, अतिशय मोठ्या मनाच्या काकूंमुळे सरांच्या व्यक्तिमत्वाला परिपूर्णता आली होती असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

गुरूचे समर्पक वर्णन करणारे रवींन्द्रनाथ टागोरांचे एक वाक्य सरांना फार आवडत असे. ते असे 'गुरु हा भूतकाळाचा दुवा आणि भविष्य काळाचा दिवा असतो.' आमच्यासाठी भातखंडेसर याहून वेगळे कुठे होते?

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

## बुद्धिवाद आणि बुद्धियोग

आजकाल बुद्धिवादाचा बोलबाला फार आहे. वर्तमान युगाला कलियुग म्हणतात. त्या ऐवजी त्याला 'बुद्धिवाद युग' म्हणणे योग्य व अर्थवाही होईल. ज्यात बुद्धीला सर्वस्व मानले जाते, प्रमाण मानले जाते, त्या विचारसरणीला बुद्धिवाद म्हणतात. त्या विचारसरणीला अनुसरून जीवन व्यतीत करणारे स्वतःला बुद्धिवादी म्हणवितात. ते स्वतःच्या आणि इतरांच्याही मनापासून दुरावलेले असतात. बुद्धिवाद हा शुष्क आणि भावभावनाहीन असतो. कारण, तो मनाला गौण मानून बुद्धीलाच प्राधान्य देत असतो. वस्तुतः मन हे बुद्धीचे उगमस्थान आहे. मनाशिवाय बुद्धीला अस्तित्व असू शकत नाही. परंतु भौतिक विषयांशी संबद्ध झालेली बुद्धी तर्काच्या सहाय्याने भरकटत जाते, मुळापासून दुरावते आणि आपण स्वयंभू, स्वयंसिद्ध आहोत असे समजू लागते. तिला सर्वश्रेष्ठत्वाचा अहंकार निर्माण होतो. त्यामुळे मनुष्य बुद्धी हीच महत्वाची आणि त्यातही माझीच बुद्धी सर्वोत्तम आहे असे समजतो. त्याच्याप्रमाणेच सर्वजण समजतात आणि त्यातून संघर्ष निर्माण होतो. संघर्ष हेच दुःखाचे मूळ कारण आहे.

अशा या अनर्थकारक, बुद्धिवादाच्या, प्रज्ञावादाच्या आहारी गेलेल्या अर्जुनाला श्रीकृष्णांनी 'बुद्धियोग' सांगितला. योगिराज ज्ञानदेवांनी त्याचे केले स्पष्टीकरण मननीय आहे.

अर्जुना समत्व चित्ताचे । तेचि सार जाण योगाचे ।
जेथे मन आणि बुद्धिचे । ऐक्य आधी ॥१॥

हे अर्जुना, मनात सत्व रज तम यांचे समानत्व असणे हे योगाचे सार आहे. तेव्हा मन आणि एकरुपता ही त्रिगुणांच्या समानतेचे प्रतीक आहे, कारण आहे.

तो बुद्धियोग निवरिता । बहुते पाडे पार्था ।
दिसे हा अरुता । कर्म भोगू ॥२॥

मनाची आणि बुद्धीची एकरुपता म्हणजे बुद्धियोग. बुद्धीशी योग-संबद्धता असणे. मनाला सोडून न भटकणे म्हणजे बुद्धियोग. त्याचे सर्वांगीण चिंतन केले असता, तो समजून घेतला असता आपल्याकडून केले जाणारे कर्म आणि त्यापासून प्राप्त होणारे सुख-दुःखात्मक भोगांचे वेगळेच रुप अनुभवाला येते.

परि तेचि कर्म आचरीजे । तरी या योगू पाविजे ।
जे कर्म शेष सहजे । योग सिद्धी ॥३॥

मन आणि बुद्धी एक ठेवून कर्म करणे म्हणजेच योग, बुद्धियोग. त्या अवस्थेत घडणारे कर्म सहज, स्वाभाविक व निरपेक्ष असते.

म्हणोनि बुद्धियोगु सुधरु । तेथ अर्जुना होओी स्थिरू ।
मने करी अव्हेरू । फळ हेतूचा ॥४॥

अशा या सुद्रुढ-सुस्थिर-कल्यकारी बुद्धियोगाची साधना कर. आपल्याकडून स्वाभाविक घडणाऱ्या कर्माच्या आणि त्या कर्माच्या हेतूचा विचारही करू नकोस.

(पृष्ठ २८ वर)

कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो म्हणूनच खाण्यापासून श्रद्धेपर्यंत सर्वच गोष्टी प्रमाणात असाव्या लागतात. श्रीयुत कृष्णाजी नारायण आठल्ये यांची खालील कविता म्हणूनच आजही महत्त्वाची ठरते. मौज प्रकाशन गृहाने २००४ साली मराठीतील 'आठवणीतील कविता' हा संग्रह चार खंडात प्रकाशित केला आहे. त्यातील भाग चार मधील श्री. आठल्ये यांची ही कविता घेतली आहे.

**- संपादक**

# प्रमाण

**कृष्णाजी नारायण आठल्ये**

अती कोपता कार्य जाते लयाला, अती नम्रता पात्र होते भयाला।
अती काम ते कोणतेही नसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१॥

अती लोभ आणी जना नित्य लाज, अती त्याग तो रोकडा मृत्यू आज।
सदा तृप्त नेमस्त सर्वां दिसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥२॥

अती मोह हा दुःख शोकास मूळ, अती काळजी टाकणे हेही खूळ।
सदा चित्त हे सद्विचारे कसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥३॥

अती ज्ञान अभ्यासल्या क्षीण काया, अती खेळणे हा भिकेचाच पाया।
न कष्टाविणे त्वा रिकामे बसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥४॥

अती दान तेही प्रपंचात छिद्र, अती हीन कार्पण्य मोठे दरिद्र।
बरे कोणते ते मनाला पुसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥५॥

अती भोजने रोग येतो घराला, उपासे अती कष्ट होती नराला।
फुका सांग देवावरी का रुसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥६॥

अती स्नेह तेथे अवज्ञा उदंड, अती द्वेष भूलोकीचे पंककुंड।
अती मत्सरे त्वां कशाला कुसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥७॥

अती आळशी वाचुनी प्रेतरुप, अती झोप घे तोही त्याचाच भूप।
सदा सत्कृतीमाजी आत्मा दिसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥८॥

अती द्रव्यही जोडते पापरास, अती घोर दारिद्र्य तो पंकवास।
धने, वैभवे त्वां न केंव्हा फसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥९॥

अती भाषणे वीटती बुद्धिवंत, अती मौन मूर्खत्व ते मूर्तिमंत।
खरे तत्त्व ते अल्पशब्दे ठसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१०॥

अती वाद घेता दुरावेल सत्य, अती होस हो बोलणे नीचकृत्य।
विचारे तुवा ज्ञानमार्गी घुसावे, प्रमाणामध्ये सर्व काही असावे ॥११॥

अती औषधे वाढवितात रोग, उपेक्षा अती आणते सर्व भोग।
हिताच्या उपायास कां आळसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१२॥

अती दाट वस्तीत नाना उपाधी, अती शून्य रानात औदास्य बाधी।
लघुग्राम पाहून तेथे वसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१३॥

अती शोक तो देतसे दुःखवृद्धी, अती मानतो हर्ष तो क्षूद्रबुद्धी।
ललाटाक्षरां सांग कोणी पुसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१४॥

अती भूषणे मार्ग तो संकटाचा, अती थाट तो वेष होतो नटाचा।
रहावे असे की न कोणी हसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१५॥

स्तुतीला अती बोलती श्वानवृत्ती, अती लोकनिंदा करी दुष्ट चित्ती।
न कोणा उगे शब्द स्पर्शे डसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१६॥

अती भांडणे नाश तो यादवांचा, हठाने अती वंश ना कौरवांचा।
कराया अती हे न कोणी वसावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१७॥

अती गोड खाणे नसे रोज इष्ट, कदन्ने अती सेवणे हे कनिष्ठ।
असोनी गहू व्यर्थ खावे न सावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१८॥

जुन्याचे अती भक्त ते हट्टवादी, नव्याचे अती लाडके शुद्ध नादी।
खरे सार शोधोनिया नित्य घ्यावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥१९॥

सदा पद्य घोकोनियां शीण येतो, सदा गद्य वाचोनियां त्रास होतो।
कधी ते कधी हेही वाचीत जावे, प्रमाणामधे सर्व काही असावे ॥२०॥

●●●

(पृष्ठ क्र. २६ वरून...**बुद्धिवाद आणि बुद्धियोग**)

जे बुद्धियोगा योजिले। तेचि पारंगत जाहले।
आहीं अुभयसंबंधी सांडिले। पापपुण्यी ॥५॥

अशा रीतीने जे बुद्धियोगाचा आश्रय करतात ते सुखदुःखातीत होतात. कर्माचा हेतू फल यांचा विचारच न केल्यामुळे ते पापपुण्यांपासून अलिप्त रहातात.

मनाच्या अनुसंधानाने बुद्धीचा वापर म्हणजे बुद्धियोग आणि मनाविरुद्ध मनाला विसरून केलेला बुद्धीचा वापर म्हणजे बुद्धिवाद. म्हणून बुद्धियोगी व्हा, बुद्धिवादी होवू नका.

(सद्धर्म त्रैमासिक -ऑक्टोबर १९९१)

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

करुन एक 'नीतिमान', 'सशक्त' आणि 'सुसंस्कृत' समाज घडवण्याचे कार्य रामदास स्वामी आणि तुकारात महाराज करत होते. तुकाराम महाराजांच्या गाथा आणि रामदास स्वामींचे दासबोध आणि मनाचे श्लोक हे याचेच प्रतिबिंब आहे. समाज प्रबोधना करता त्यांचे ग्रंथ आजही तेवढेच मार्गदर्शक आहेत. कित्येक पुस्तके लिहून किंवा व्याख्याने देऊन जे स्पष्टपणे सांगता येणार नाहीत असे विचार त्यांनी अत्यंत सोप्या, साध्या शब्दांत मांडले आहेत. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' याला म्हणूनच सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला आहे.

'विठ्ठल' हे तुकाराम महाराजांचे दैवत होते तर 'श्रीराम प्रभू' हे समर्थांचे स्फूर्तीस्थान होते. भक्ती हा त्यांच्या लिखाणाचा गाभा असला तरी समाज प्रबोधन हे त्याचे उद्दिष्ट होते. भक्तीमध्ये समर्पण असते ते अहंकार, हिंसक प्रवृत्ती, द्वेष, मत्सर, स्वार्थ आणि लोभाचे. हे झाले तरच सहिष्णु, विवेकी व्यक्ती आणि समाज निर्माण होऊ शकतो. भक्तीचा हा आत्मा हरवला, तर शिल्लक राहतो तो दांभिक उपचार. तुकाराम महाराजांच्या काळातही कुडमुडे ज्योतिषी आणि टिळा-माळा घालून वावरणारे संत होते. त्यांचा समाचार तुकाराम महाराजांनीच खालील पंक्तीत घेतला आहे.

'बरें जालें निघाले दिवाळें। बरी या दुष्काळें पीडा केली॥
अनुतापें तुझें राहिलें चिंतन। जाला हा वमन संवसार॥
बरें जालें देवा बाईल कर्कशा। बरी हे दुर्दशा जनामध्यें॥

विठ्ठल भक्ती आणि तुकाराम महाराजांच्या नावांनी होत असलेल्या आजच्या पंढरींच्या वाऱ्यांचा म्हणूनच पुनर्विचार करणे आज नक्कीच गरजेचे आहे. 'दूर झाला विचार, राहिला फक्त उपचार' असेच त्याचे वर्णन आता करावे लागेल. दृक माध्यमांनी त्यांची केलेली प्रसिद्धी, आणि त्यावेळी निवेदकांनी बहुतेक वेळा अज्ञानावर आधारित केलेली निवेदने, हास्यास्पद आणि तार्किक दिवाळ खोरीच्या उंबरठयावरील होती. संस्कृती रक्षण तर सोडाच, पण नवीन पिढीकरता हे सगळेच निरर्थक वाटावे असे होते.

हाच प्रकार नाशिकच्या कुंभमेळ्याचा. प्रत्येक धर्माला एक ऐहिक बाजू असते तशी आध्यात्मिक बाजूही असते. हिंदुंच्या वर्णाश्रम व्यवस्थेमध्ये याचा पूरेपूर विचार सामान्य माणसाकरता केला आहे. सामान्य मनुष्य ऐहिक आणि पारमार्थीक दोन्हीही पदरांनी जीवन जगण्यास उत्सुक असतो. साधु, ऐहिक जीवनाचा त्याग करुन आपले सगळे आयुष्य 'चिंतन' आणि 'मनना'मध्ये व्यस्त करीत असतात. यामुळे मानवाच्या षड्रिपुंवरती साधुंचा ताबा आलेला असतो, अशी समाजाची धारणा असते. यामुळेच हिंदु समाजामध्ये साधुंबद्दल एक आदर असतो. तो त्या व्यक्तीपेक्षा त्यांनी केलेल्या त्याग भावनेचा असतो.

कुंभमेळयाला आलेल्या साधुंच्या बाबतीत त्याचा लवलेशही दिसत नव्हता. दृक् माध्यमांना साधुंनी दिलेल्या मुलाखती हा तर एक विनोदाचा भाग होता. निवेदकांचे प्रश्न आणि

त्यांतून हिंदुधर्माबद्दल दिसणारे त्यांचे अज्ञान, हा आणखीन एक संशोधनाचा विषय आहे. आपण किती संस्कृती आणि धर्मनिष्ठ आहोत, याचे नाशिकला राजकरण्यांनी केलेले प्रदर्शन, हा तर दांभिकपणाचा कळस होता. सोन्यानी मठलेले साधु काय, किंवा त्यांच्या आखाड्यांमधली भांडणे काय, हा सगळाच प्रकार किळसवाणा होता. प्रत्येक धर्मप्रेमी माणसाला आपल्या धर्माची चाललेली ही 'विटंबना' बघून खरं म्हणजे राग यायला हवा.

कुंभमेळा ही 'संधीसाधुं'ची भाऊगर्दी होती. दिशाहिन, अर्थहीन अशा या गर्दीचं नियोजन करताना सर्वच व्यवस्थेंवर परकोटीचा ताण पडला. 'साधु' पणाचा लवलेशही नसलेल्या या गर्दीच्या अभ्यंगस्नानाकरता पाण्याचा केलेला वापर तर अक्षम्य आहे. 'साधु' या संकल्पनेची आज समाजाला नितांत आवश्यकता आहे. अर्निबंध 'चंगळवादी' जीवनशैलीला नियंत्रणात आणण्याकरता तो एक आवश्यक 'उपचार' आहे. दुर्दैवानी नाशिकच्या कुंभमेळ्यात दिसले ते 'भोंदूबाबां'चे सरकारी खर्चाने झालेले आदरातिथ्य.

पंढरपूरची वारी किंवा नाशिकचा कुंभमेळा परवडला, यापेक्षा भयानक अधोगती दहीहंडी आणि गणेशोत्सव साजरे करण्यामध्ये आपल्याला दिसते. या सणांच्या मूळ प्रयोजनाचा लवलेशही सध्याच्या या उत्सवामध्ये आपल्याला दिसत नाही. या दोन्हीही उत्सवांचा ताबा सध्या सर्वपक्षांच्या राजकारण्यांनी घेतला आहे. रस्त्यांवरील मंडपापासून ते ध्वनीप्रदूषणापर्यंत सर्व नियम या राजकारण्यांनी धाब्यावर बसवल्यामुळे सर्वसामान्य नागरीक त्रस्त झाला आहे. याचीच नोंद घेऊन न्यायालयाने या सणांच्या साजरीकरणावर काही बंधने घातली.

दहीहंडीमध्ये दरवर्षी ऊंच थरावरून पडून अनेक तरुण जखमी होतात, तर काहीजणांना आपल्या प्राणाला मुकावे लागते. थरांच्या ऊंचीच्या जीवघेण्या स्पर्धेमध्ये लहान मुलांना सर्वात वरच्या थरावर चढवण्यात येते. यात सहभागी होणारी मंडळे, कलाकार किंवा आयोजक हे इतके संवेदनाशून्य आहेत की, आपण काही चूक करत आहोत हे ही त्यांना मान्य नाही. हे सर्व उत्सव, सण चक्क रस्ते अडकवून, रहदारी आणि वाहतुकीचा खेळखंडोबा करून साजरे होत असतात. न्यायालयानी सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या सुरक्षितता, आणि नागरीकांची गैरसोय टाळण्याकरता या सणांच्या साजरीकरणावरही काही बंधने घातली.

सध्या राजकारणामध्ये गुंडप्रवृत्तींच्या धटींगणांचा भरणा जास्त आहे. यामुळेच कोर्टाचे निर्बंध असूनही, यावर्षी या राजकीय लोकप्रतिनिधींनी कोर्टाचे निर्बंध धाब्यावर बसवून थरांची मर्यादा आणि ध्वनीप्रदूषणाचे सर्व नियम पायदळी तुडवून, रस्ते अडवून दहीहंडी साजरी केली. ज्यांनी कायदे करायचे आणि पाळायचे त्यांनी बेधडकपणे ते मोडले. गणेशोत्सवांच्या मंडपांच्या बाबतीतही हेच घडले. उत्सवांकरता वर्गणीही व्यापारी आणि नागरीकांकडून खंडणीसारखी वसूल केली जाते. गणपतिचे आगमन आणि विसर्जनाच्यावेळी मिरवणूकांमधून होणारी गाणी आणि हिडीस नाच हे तर 'उबग'

आणणारे आहेत. गणपति हे 'विद्या' आणि 'कले'चे दैवत आहे. त्याच्या उपासनेतून अनेक साहित्यकृती आणि सर्जनशील नृत्य, चित्रकलांची निर्मिती महाराष्ट्रात झाली आहे. इतकी र्निबुद्ध आणि अभिरुचीहीन नाच गाणी त्याच्या उत्सव, आगमन किंवा विसर्जन मिरवणूकीत सादर करणे हा सांस्कृतिक गुन्हा आहे. सर्वात वाईट म्हणजे ही 'अरेरावी' आणि 'धटींगणशाही' धर्म आणि संस्कृती रक्षणाकरता चालू असते. महाराष्ट्रातल्या एकूण एक राजकिय पक्षांच्या झेंड्याखाली आणि आशिर्वादाने हे सराइतपणे चालू आहे. माध्यमांचा वेळ आणि शाईचा अभिषेक याकरता होत असतो.

धर्म, संस्कृती किंवा परंपरेची यापेक्षा मोठी विटंबना दुसरी कुठली असू शकते कां?

हा सगळा 'कायदेभंग' पोलीस, पालिका आणि महापालिकेचे 'सक्षम' अधिकारी मख्खपणे पहात असतात. राजकारणी, गुंड, पोलीस आणि नोकरशहा यांच्यातील अभद्रयुतीचे यापेक्षा चांगले उदहाहरण सापडणार नाही.

ही एक अतिशय गंभीर बाब आहे.

येणाऱ्या 'अराजकतेची' ही एक नांदी आहे.

लोकशाहीमध्ये सामान्य माणसाकरता न्यायालय ही एक 'अंतिम' पायरी असते. न्यायालयाची 'निष्प्रभता' ही गुंडप्रवृत्तींच्या राजकारणी आणि भ्रष्ट नोकरशहांना एक वरदानच असते. 'सवंग' लोकप्रियता आणि मतांच्या राजकारणाकरता संस्कृती रक्षणाखाली, पक्षीय नेतृत्त्व जेंव्हा अशा अरेरावी आणि धटिंगण प्रवृत्तींना पाठींबा देते तेंव्हा, सर्व विवेक आणि संकेतांचा भंग झालेला असतो. आपल्या दिलेल्या आश्वासनांची पूर्ती जेंव्हा होत नसते, तेंव्हा समाजाला असल्या 'बाजारु' उत्सवांमध्ये 'गुंतवून' ठेवण्यात कदाचित राजकारण्यांची सोय होत असेल, पण धर्म आणि संस्कृतीचा त्यांच्याशी काडीचाही संबंध नसतो.

राजकारणातील सत्ता बदल हा समाजा करता, 'धटींगण', 'अरेरावी' राजकीय संस्कृतीचे नव्या कागदावरील पुर्नमुद्रणवाटावे अशीच आजची परिस्थिती आहे.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात मराठेशाही संपून ब्रिटीशांचे राज्य महाराष्ट्रातही चालू झाले. श्री. बी. आर. सुंठणकर यांनी १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासावरती पुस्तक (१९८८) लिहीताना त्याकाळचे जे वर्णन केले आहे ते म्हणूनच वाचण्यासारखे आहे.

''ब्रिटीशांनी महाराष्ट्र ताब्यात घेतला तेंव्हा परस्पर विघातक अशा लढायांनी देश जर्जर होऊन गेला होता. खेड्यापाड्यावर पेंढाऱ्यांच्या आणि लुटारुंच्या धाडी पडत. खानदेशासारखा सुपीक मुलूख दुष्काळ आणि लुटीमुळे ओसाड झाला होता. सुरक्षितता आणि शाश्वती नसल्याने शेतकरी खचून गेला होता. पेशवे जाऊन परके ब्रिटीश आले होते. ब्रिटीशांची सत्ता स्विकारली गेली, पण त्यात फारसा उत्साह किंवा आशा नव्हती.''

आज परके ब्रिटीश नसले, तरी सामान्यांशी काडीचाही संबंध नसलेले राजकीय वाद, लढायांसारखे लढणारे स्वकीय राजकारणी आहेत. लुटारु नसले तरी उत्सवांकरता वर्गणी, खंडणीसारखी वसूल करणारे उत्सववीर आहेत.

भ्रष्टाचाराने बरबटलेल्या पोलिस आणि प्रशासकिय निष्क्रियतेमुळे साम्राज्यावाद बरा होता असे दुर्दैवाने म्हणण्याची पाळी आज आली आहे. परकियांपेक्षा स्वकियांशी लढणे जास्त क्लेशकारक असते.

खंडणी सदृश्य वर्गणी, रस्ते अडवून मंडप, अभिरुचीहीन नाच गाण्यांचा धिंगाणा, आणि ध्वनी प्रदूषण या सर्व गुन्ह्यांची तीव्रता कमी करण्याकरता, अवर्षण ग्रस्तांना मदत, रक्तदान अशा सामाजिक कामांचे 'वेष्टन' या उत्सवांच्या समर्थनार्थ देण्यात येते. याही पेक्षा भयानक म्हणजे गणरायाच्या मंडपाबाहेर दुतर्फा, ज्यांच्यावर खून, बलात्कार, अपहरण इ. गुन्हे दाखल आहेत अशा लोक प्रतिनिधींचे फोटो लावलेले असतात. राजकारण्यांनी या उत्सवात केलेल्या घुसखोरीचे यापेक्षा चांगले उदाहरण सापडणार नाही. विद्या आणि कलांची देवता असलेल्या गणेशाची इतकी प्रचंड विटंबना दुसरी कोणतीही असू शकत नाही.

या उत्सवांच्या वेळी जी गर्दी जमते त्यामुळे 'जातपात' लोक विसरतात हा या उत्सवांच्या समर्थनार्थ केलेला दुसरा एक जावई शोध!! दुसऱ्याच दिवशी त्यांची धावपळ चालू होते ती आपल्या 'जातीय' मागसलेपणाचा दाखला घेऊन, लहान शिशु किंवा महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी. धनगर, मराठा इत्यादींना आरक्षण मिळवण्याकरताही गर्दीचा यामुळेच तुटवडा नसतो. गर्दी हा 'जातपात' निर्मुलनाचा मार्ग असेल तर मुंबईच्या रेल्वेतील गर्दींनी जातपातीचे केंव्हाच उच्चाटन केले आहे. असल्या बाजारु उत्सवांची त्याला गरज नाही.

'यथा प्रजा तथा राजा' अशी एक जुनी म्हण आहे. अविवेकी, असंस्कृत आणि संवेदनाशून्य समाजाचे नेतृत्वही तेवढेच असंस्कृत असते. दुर्जनांच्या जुलमापेक्षा सज्जनांची निष्क्रीयता अधिक धोकादायक असते. म्हणूनच आपल्या या सणांचे, उत्सवांचे विकृतीकरण आणि व्यावसायिकीकरण थांबवायचे असेल तर प्रत्येक सुजाण नागरिकाने आपल्या क्षमतेनुसार याला विरोध करायला हवा.

संस्कृती आणि धर्म रक्षणाकरता यासारखा दूसरा सनदशीर मार्ग नाही.

●●●

एक्कावन्नाव्या वर्षाचा हा पहिला अंक. अंका सोबत सद्धर्मने फार पूर्वी प्रकाशित केलेली लक्ष्मी पूजन पुजा विधि: (हस्तलिखीत) ही पोथी वाचकांसाठी पुन:मुद्रित करून भेट म्हणून पाठवित आहोत. असे नवनवीन उपक्रम सुरू करण्याचा सद्धर्म प्रकाशन व न्यासाचा मनोदय आहे. म्हणून सर्व देणगीदार सभासदांस अशी विनंती आहे की त्यांनी उपक्रम सूचना कराव्यात. त्यांचे स्वागत आहे. योग्य, नावीन्यपूर्ण आणि व्यवहार्य उपक्रम / सूचनांचा विचार नक्की केला जाईल.

**- संपादक**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१